# स्त्री आरोग्य क्षेत्रातील माझी वाटचाल



> सारे शहरी मोह सोडून एक ध्येयवादी स्त्रीरोगतज्ज्ञ गडचिरोलीच्या आदिवासी स्त्रियांशी समरस होऊन त्यांचे सामुदायिक आरोग्याचे प्रश्न सोडवायला घेते आणि आपल्या कार्यातून जागतिक आरोग्य संघटनेची स्त्री आरोग्याची संकल्पनाच बदलून टाकते. आपल्या ह्या प्रवासाचा तिने अतिशय नम्रपणे पण सजगतेने घेतलेला ओघवता आढावा

लेख




**डॉ. राणी बंग**

(आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या स्त्रीरोगतज्ज्ञ आणि सामुदायिक आरोग्य विषयाच्या संशोधक)

search.gadchiroli@gmail.com


नमस्कार मंडळींनो!

खरे म्हणजे मी इतकी भारावलेली आहे! बरोबर ४५ वर्षांपूर्वी २ नोव्हेंबरलाच अभयसोबत लग्न होऊन मी प्रथम वर्धेला आले होते. तेव्हापासून, मी जेव्हा जेव्हा वर्धेला येते, तेव्हा मला कधीच असं वाटत नाही की हे माझं सासर आहे. इथल्या प्रत्येक कुटुंबातल्या लोकांनी मला इतके प्रेम आणि घरपण दिलेले आहे की मला हे माहेरच वाटते. श्रीकांत आणि मीना हे आमचे खूप जवळचे मित्र होते. श्रीकांत गेल्याचं दुःख फार होतं पण मीनाने आणि त्यांच्या सर्व घरच्यांनी ते खूप खंबीरपणे पेललं आहे. त्या श्रीकांतच्या स्मृतिप्रीत्यर्थ आज मी पुन्हा इकडे आले. सर्वप्रथम मी श्रीकांतला श्रद्धांजली वाहते. त्या सगळ्या आठवणी मनात गर्दी करीत आहेत. इथे केवळ व्याख्याता म्हणूनच



नाही, तर माझ्या कुटुंबीयांना भेटायलाही आले. आज विभा इथं नाही. पण विभा माझी जिवलग मैत्रीण, शोभना माझी जिवलग मैत्रीण, डॉ. उल्हास जाजू हे वर्गमित्रच नाही तर अगदी आमच्या घरोब्याचे. असे इथे आलेले सर्वजण अगदी जवळचे आहेत. रवि, अनुराधा ह्यांनी मला फोन करून बोलावले आणि मला वाटले की आपल्याला गेलेच पाहिजे. मीनाने माझी खूप मोठी ओळख करून दिली, पण मी आपल्याला नम्रतेने सांगू इच्छिते की मी काही एवढी मोठी व्यक्ती नाही. मी अगदी सर्वसामान्य आहे. तीन गोष्टींचा मला अभिमान आहे, एकतर मी स्त्री म्हणून जन्माला आले, दुसरे मी स्त्रीरोगतज्ज्ञ आहे त्यामुळे रोज अनेक स्त्रिया, विशेषतः ग्रामीण भागातील - त्यांच्या शरीरातली आणि मनातली गुपिते माझ्यासमोर मांडत असतात आणि माझं सौभाग्य की त्या माझ्याकडून उपचार करून घेतात. तिसरे म्हणजे मी दोन मुलांची आणि एका सुनेची आई आहे.

आजचा विषय आहे 'स्त्री आरोग्य'. इथे अनेक स्त्रिया माझ्यासमोर आहेत. तरुण मुली आहेत. त्या सगळ्यांशी मला माझाही प्रवास शेअर करायला आवडेल. वर्ध्यामध्ये प्रथम आली, तेव्हाची राणी आजच्यापेक्षा खूप वेगळी होती. खूप वेगळ्या वातावरणात माझा जन्म झाला आणि मी लहानाची मोठी झाले. सार्वजनिक आरोग्याचं जे काम गेली काही वर्षे मी करीत आहे, ते मी नंतर शिकले. अगदी खरं सांगते की, अभय बंग हा माझा सार्वजनिक आरोग्यातला पहिला गुरू आहे. वैद्यकीय महाविद्यालयात आल्यावर अभयशी माझी ओळख झाली आणि लोकांसाठी खेड्यांमध्ये काहीतरी काम करतात, याची मला पहिल्यांदा जाणीव झाली. त्यापूर्वी मला ह्याबद्दल काहीही माहीत नव्हतं. माझी स्वप्नं अगदी सरळ होती. माझी भावंडं गेली त्याच मार्गाने मला जायचं होतं. इंग्लंडला जाऊन RCOG (Royal College of Obstetricians and Gynaecologists) मध्ये प्रवेश घ्यायचा विचार होता. पण अभयशी लग्न करण्याच्या दोन वर्ष आधीपासूनच जॉन्स हॉपकिन्स संस्थेकडून मला रिसर्च फेलोशिप मिळाली. लग्नानंतरही ते मला वारंवार म्हणत होते की तू हे काम चालू ठेव. पण आता मला एक वेगळी दिशा मिळाली होती. वेगळं कुटुंब मिळालं होतं. पिताजी, बाई, अशोकदादा, पद्मजादीदी यांचा सहवास मिळाला. मला आठवतं मी जेव्हा पहिल्यांदा इथं आले तेव्हा कामासाठी माझे हात शिवशिवायचे. कारण त्यापूर्वी मी मेडिकल कॉलेजमध्ये लेक्चरर होते. ऑपरेशन्स वगैरे करत असे. वर्ध्यात मात्र त्यावेळी खेड्यातलं काम सुरू व्हायचं होतं. म्हणून माझ्या सासूबाई सुमनताई – आम्ही त्यांना बाई म्हणत असू – म्हणाल्या की तू सेवाग्राम रुग्णालयात काम

सुरू कर. मी तसं केलं. खूपदा मला घरी यायला उशीर व्हायचा. ४-५ वाजायचे. बाई तर माझ्यासाठी जेवायला वाट बघायच्याच पण त्या अभयलासुद्धा माझ्यासाठी थांबायला लावायच्या. मला खूप वाईट वाटायचं. मी म्हणायची तुम्ही लोक जेवून घेत जा, तर बाईंनी माझ्यासमोर एकदा अभयला म्हटले की, केवळ पत्नीने पतिव्रता असून चालणार नाही तर पतीनेही पत्नीव्रत असलं पाहिजे. असं ते कुटुंब. असं ते वातावरण. त्यासोबतच वर्धेतल्या सर्व मंडळींनी अत्यंत प्रेमाने मला साथ दिली. कधी गमतीदार अनुभवही यायचे. मी पवनारला गेलेली असताना काही लोक जवळ येऊन साडीला-ब्लाऊजला हात लावून बघायचे. म्हणायचे, "ये खादी है ना?" मला मजा वाटायची.

कधी कधी अभयचे गांधीवादी मित्रमंडळ म्हणायचे की ही तर वेगळी आहे! हे ऐकून मला खूप वाईट वाटायचं. हो, आहे मी वेगळी, पण तुम्ही मला सांभाळून घ्या ना तुमच्यामध्ये! मला तुमच्यात सामील व्हायचं आहे. ह्या वेगळेपणाशी जुळवून घेताना अनेक प्रश्न आले. पहिला मुद्दा लग्नाचाच. माझे आईवडील मी अभयशी लग्न करण्याच्या प्रचंड विरोधात होते. त्यांना पटवणं हे माझ्यापुढचं आव्हान होतं. खरं म्हणजे माझ्या दोन्ही भावांचे आंतरजातीय विवाह झालेत. पण मी मुलगी होते ना. मग मी तरी त्यांच्या मतानुसार वागायला पाहिजे, असं त्यांचं मत. .

माझे आईवडील हे दक्षिण भारतातील अय्यंगार ब्राम्हण! हे लोक अतिशय शिकलेले पण खूप रूढीवादी असतात. त्यातून ते गडगंज श्रीमंतही होते. मी घरातली शेवटची मुलगी. त्यामुळे माझे खूप थाटामाटात लग्न करावं असंही त्यांना वाटायचे. पण माझा तीन गोष्टींचा आग्रह होता. एकतर लग्न अतिशय साध्या पद्धतीनं व्हावं. दुसरं म्हणजे मी विवाहितेची चिन्हं अंगावर घालणार नाही आणि तिसरं म्हणजे माझं कन्यादान होऊ नये. ह्या तीन्ही गोष्टींना कारणं होती. लहानपणापासूनच माझ्या मैत्रिणी इतक्या गरीब घरांतल्या होत्या, की त्यांना अशी मोठी लग्नं करणं शक्यच नव्हतं. समाजातले बडे लोक जसे वागतात त्यांचेच अनुकरण लहान लोक करतात आणि त्यामध्ये त्यांना झेपत नसताना जादा खर्च करावा लागतो. अनेकदा त्यामुळे त्यांच्यावर कर्जही होतं. त्यामुळे माझं लग्न अगदी साध्या पद्धतीने व्हावं. दुसरं म्हणजे माझ्या आत्याचे यजमान वारले तेव्हा मी तिला भेटायला गेले होते. पाहते तर नवरा मेल्याचं तिचं दुःख दूरच राहिलं, आणि आमच्या नात्यातल्या बाया येऊन त्यांनी अगदी समारंभपूर्वक तिचं कुंकू पुसलं. तिचं मंगळसूत्र ओढून काढलं. तिची जोडवी ओढून काढली. त्याच क्षणी मी निर्णय घेतला की मी माझ्या लग्नाबाबत असं होऊ देणार नाही. लग्नाच्या वेळी अभयशी चर्चा केली. त्याला म्हटलं की नवरा मेला की बायकोला हे सारे अलंकार काढावे लागतात. तर मी मेल्यावर काढायला तू असं काही लग्नात घालशील का? तो म्हणाला मी असं काही घालणार नाही. मी म्हटलं, मग मी पण नाही घालणार. माझ्या आईवडिलांना सांगितलं की अभय घालत नाही तर मी पण मंगळसूत्र आणि जोडवी घालणार नाही. हा माझ्या आईवडिलांना धक्काच होता. आमच्याकडे मंगळसूत्राची गाठ नवरा मुलगा बांधतो. ते म्हणाले, "व्हाट इज द सँक्टिटी टू युवर मॅरेज?" मंगळसूत्र घालणार नसशील तर तुझ्या लग्नाला पावित्र्यच काय राहिलं? कन्यादानाबद्दल मी म्हटलं, मी काही वस्तू नाही की माझं दान करावं. कारण आमच्या घरामध्ये गोदान, भूदान, सुवर्णदान हे सर्व होताना मी पाहिलं होतं. शेवटी लग्नाला त्यांनी कशीबशी मान्यता दिली. सुदैवाने अभयच्या घरची सर्व मंडळी ही गांधीवादी असल्यामुळे त्यांच्यासाठी हे नवीन नव्हतं. पण आमच्या घरी मात्र प्रचंड गदारोळ होत होता. पण मी ह्या सर्व मुद्द्यांवर अगदी ठाम होते. सरतेशेवटी आमचं लग्न थोडंसं वेगळ्या पद्धतीने पार पडलं. आईवडील सुरुवातीला प्रचंड नाखुश होते. त्यांना वाटत होतं की ही काय, ५-६ महिन्यात घरी परत येईल. त्यानंतर एक एक नातेवाईक माझ्याकडे येऊन बघायचे की मी ठीकठाक आहे की नाही.

आम्ही वर्ध्यात काम सुरू केलं. कान्हापूर-महाकाळला आम्ही जायचो. तिथे आठवड्यातून तीनदा दवाखाना चालवायचो. मी एम. डी.ला सुवर्णपदक मिळवलं होतं. हुशार विद्यार्थी म्हणून गणली जायचे. पण कान्हापूर-महाकाळला एकही पेशंट माझ्याकडे यायचा नाही. एकही बाई माझ्याकडे यायची नाही. गरोदर बाया तर चुकूनही यायच्या नाहीत. सर्व अभयच्या तिथे रांग लावायच्या. अभय त्यांना सांगायचा की बाई डॉक्टर आहेत, त्यांच्याकडून तपासून घ्या. पण त्यांचा विश्वासच बसेना, "नर्साबाई गावात येते, डॉक्टरीन बाई कुठं गावात येते?" त्या म्हणायच्या. तोही अनुभव मला बरंच शिकवून गेला. माझा जो डॉक्टर होण्याचा अहंकार होता, तो पार धुळीला मिळवला इथल्या बायांनी. पण गम्मत अशी झाली की त्यावेळेला मी इथल्या सेवाग्राम मेडिकल कॉलेजमध्ये काम करत होते, नंतर वर्ध्याच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये ऑनररी कन्सल्टंट होते. त्यावेळी कान्हापूरच्या सरपंचाच्या घरच्या एका मुलीचं सिझेरिअन मी केले. त्यानंतर तेच गावात सांगू लागले "अहो खरंच! ही डॉक्टरीन बाई आहे". मग मात्र पेशंट माझ्याकडे येऊ लागले. असे कसोटीचे प्रसंग होते ते!

त्यानंतर आम्हा दोघांनाही वाटलं की आम्ही सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करतोय, पण आमचं त्याबाबतीत शिक्षण फार अपुरं आहे! क्लिनिकल मेडिसिन ही एक वेगळी शाखा आहे. हॉस्पिटलमध्ये एक रुग्ण तुमच्याकडे येतो, तुम्ही

त्यावर उपचार करता. तेव्हा तुम्ही म्हणाल तसं त्या रुग्णाला ऐकावं लागतं. पण सार्वजनिक आरोग्यामध्ये, संपूर्ण गावाचं आरोग्य कसं चांगल राहीलं ते बघावं लागतं. तिथे काही प्रत्येकजण आजारी नसतो, प्रत्येकाची केस वेगळी. परिस्थिती वेगळी. अशा पद्धतीनं, ते एक वेगळं कौशल्य आहे, एक वेगळं शास्त्र आहे. मेडिकल शिक्षणात ते आम्हाला शिकवलं जात नाही. म्हणून मग आम्हाला असं वाटलं की आपण मास्टर्स करावं. तेव्हा डॉ. सुशीलाबेन नायर ह्या अमेरिकेतील जॉन्स हॉपकिन्स स्कूल ऑफ मेडिसिनमध्ये होत्या. त्यांना आमची धडपड माहीत होती. त्यांनी तिथल्या लोकांशी बोलणं केलं. त्यावेळेला डॉ. हॅरसन हे हॉपकिन्सचे डीन होते. आज पूर्ण जगामधून ज्या देवीच्या रोगाचं (small pox) उच्चाटन झालेलं आहे, त्याचं बरचसं श्रेय डॉ. हॅन्डरसन ह्यांचे आहे. दुसरे प्रोफेसर कार्ल टेलर, त्यांचा जन्म भारतातच झाला होता. त्यांचे वडील डॉक्टर होते. सार्वजनिक आरोग्याबद्दल त्यांनी भारतामध्ये बरंच काम केलं होतं. त्या दोघांचं आम्हाला पत्र आलं, की तुम्ही या इथे. आम्ही तुमच्या शिक्षणाची सोय करू.

पण त्या वेळेला आमच्यासमोर प्रश्न होता पैशाचा! दहा हजार डॉलर नुसती ट्युशन फी होती. आता तर खूप वाढली आहे. आम्ही त्यांना कळवलं. ते आम्हाला म्हणाले, काळजी करू नका. आम्ही तुमच्या फेलोशिपची व्यवस्था करतो. एका वर्षाचा अभ्यासक्रम होता. खरा प्रश्न त्याच्यानंतर सुरू झाला. आमचा मोठा मुलगा आनंद त्यावेळी दोन वर्षांचा होता. त्याची सोय कुठे करायची? माझ्या माहेरी- सासरी दोन्हीकडे अतिशय शिकलेली माणसे. स्त्रीचे शिक्षण व्हायला पाहिजे असा विचार करणारी. पण मुलाच्या प्रश्नावर त्यांचं एकच उत्तर – राणीने एवढे लहान मूल असताना परदेशात जाऊ नये. दुसरीकडे अभयही एकटा जायला तयार नव्हता. तो म्हणायचा, तू माझ्यामुळे दोनदा फेलोशिप सोडलीस. आता ही नाही सोडायची. जाऊ तर आपण दोघेजण. मी डॉ. टेलर आणि डॉ. हेंडरसन ह्यांना पत्र लिहिलं की, माझा मुलगा लहान आहे मी काही येऊ शकणार नाही. तुम्ही अभयला आग्रह करा. ह्यानंतर काय घडलं असेल?

ही दोघं ख्रिश्चन धर्माची, गोरी माणसं. मी आयुष्यात कधी त्यांना पाहिलं नव्हतं, काही नाही. त्यांचं मला पत्र आलं! "आई असणे हा गुन्हा नाही! कोणी सांगितलं की तू आई आहेस म्हणून तुला शिक्षण घेता येणार नाही? आम्ही आधीच चौकशी केली आहे तुला लहान मूल आहे. आम्ही तुझ्या फेलोशिपमध्ये तुझ्या मुलाच्या प्रवासाची, तिथे राहण्याची, शाळेत जाण्याची व पाळणाघराची पूर्ण सोय केलेली आहे." त्या दोघा गुरुजनांच्याविषयी कृतज्ञता मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. ही जगातली पहिली फेलोशिप असेल, जिथे आईला शिकायला मिळावं म्हणून तिच्या मुलाला फेलोशिप देण्यात आली. असे खूप चांगले अनुभव मिळाले. हॉपकिन्सच्या शिक्षणाचा खरंच आम्हाला खूप फायदा झाला. तिथून आल्यानंतर असं वाटलं की, वर्धा जिल्ह्यामध्ये खूप स्वयंसेवी संस्था आहेत आणि त्या खूप चांगले काम करतात. आपण आणखी थोड्या मागासलेल्या भागात जावं. मी मूळ चंद्रपूर जिल्ह्याची. गडचिरोली जिल्हा हा चंद्रपूर जिल्ह्यापासून नुकताच १९८२ साली वेगळा झाला होता. त्यामुळे आम्ही तिकडे जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळचे सार्वजनिक आरोग्यसचिव श्री. व्ही. श्रीनिवासन आणि आरोग्यमंत्री डॉ. भाई सावंत हे होते. श्रीनिवासन हे आधी जागतिक बँकेत होते. त्यामुळे त्यांना हॉपकिन्सबद्दल माहीत होतं. त्यांनी म्हटलं की एवीतेवी तुम्ही गडचिरोलीला जात आहात, तर तिथल्या नागरी रुग्णालयातील दोन प्राथमिक आरोग्य केंद्राची जबाबदारी घ्या. आम्ही १९८५ मध्ये तिथे गेलो तेव्हा ते ३००० वस्तीचं छोटं खेडं होतं. तिथे प्राथमिक आरोग्य केन्द्र होतं . त्यांनी त्याची पाटी बदलून त्याला जिल्हा रुग्णालय म्हटलं. पण त्यामध्ये काहीच काम व्हायचं नाही. जिल्हा शल्यचिकित्सक रत्नागिरीचे होते! ते वर्षातून दोन-तीनदा यायचे. त्या जिल्ह्यातलं पहिलं सिझेरिअन मी केलं आहे. आम्हालाही बरं वाटलं की वेगळं रुग्णालय उभारण्याची गरज नाही! त्या वेळेला इथे नागपूर विभागाचे उपसंचालक होते डॉ. अग्रवाल आणि इथल्या नागरी रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक होते डॉ. खंडेलवाल. निवासी वैद्यकीय अधिकारी होते डॉ. भांगे. मे महिन्याचा दिवस होता. अभय गावात नव्हता. डॉ. खंडेलवालांचा मला फोन आला की - "डॉक्टर राणी मॅडम, डॉक्टर अग्रवाल आले आहेत, त्यांना तुम्हाला भेटायचं आहे, तर तुम्ही कृपा करून सिव्हिल हॉस्पिटलमध्ये या. अमृत तेव्हा सहा महिन्याचा होता, माझ्याकडे गाडी वा वाहन नव्हतं, मग मुलांना कुठे ठेवायचं तर पेंटे काकू, आज मनीषाजी इथे आहेत, त्यांच्या सासूबाई. पेंटे काकू, आणि काका अगदी आमच्या घरच्यासारखे होते! तर मी पेंटे काकूंकडे अमृत आणि आनंदला ठेवलं आणि पायी चालत गोपुरीतून नागरी रुग्णालयात आले. बघते तर डॉ. अग्रवाल बसले होते आणि त्यांच्यासोबत दिल्लीचे एक सेक्रेटरी पण होते. मी आल्याबरोबर डॉ. खंडेलवाल यांनी त्यांना म्हटलं, "बंग मॅडम आल्या आहेत. तुम्हाला त्यांच्याशी काही बोलायचं होतं ना त्यावर अग्रवाल म्हणाले, "या बाईशी काय बोलणार? "मी डॉक्टर अभय बंगांशी बोलणार! या बाईला काय समजतं? मी अक्षरशः चकित राहिले, की हा माणूस हे काय बोलतोय! डॉ. खंडेलवाल व डॉ. भांगे त्यांना परोपरीने विनवीत होते, अहो नाही हो, त्या पण हुशार आहेत. तुम्ही त्यांच्याशी एकदा बोला तरी. पण त्यांनी काही न बोलता तोंड फिरवून घेतले आणि सेक्रेटरीशी बोलत बसले. एक क्षण मला

असे वाटले की ताडकन निघून जावं इथून. इतका अपमान करताहेत. पण दुसऱ्या क्षणी माझ्या आई-वडिलांचे शब्द मला आठवले - माझ्यावर खूप प्रभाव आहे माझ्या आईवडिलांचा - आपण कुणावरती अन्याय करायचा नाही आणि आपणही कुणाचा अन्याय सहन करायचा नाही! अन्याय करणारा जितका गुन्हेगार असतो, तितकाच अन्याय सहन करणारा.

मग मी काय केलं मी ज्या खुर्चीत बसले होते, तिथून उठून ती खुर्ची हातात घेतली आणि त्यांच्यासमोर जाऊन बसले. त्यांना म्हटलं, 'हे बघा डॉक्टर अग्रवाल, मी काही इथे स्वतःहून आलेली नाही. तुम्हाला माहीत होतं माझा नवरा इथे नाही, आणि तुम्ही डॉक्टर खंडेलवालांना म्हटलं की मी मिसेस बंग सोबत बोलेन, म्हणून मी इथे आले. तुमच्या माहितीसाठी, मी आणि अभय दोघेही एम डी आहोत आणि आम्ही दोघांनीही एम्. पी. एच्. केलं आहे. महाराष्ट्र शासनाला जी काही पत्रे जातात, ती आमच्या दोघांच्या सहीने जातात. तेव्हा तुम्हाला आता माझ्याशी बोलावंच लागेल. त्यावर ते तत पप करायला लागले. त्यांनी कधी कल्पनाच केली नव्हती की ही बाईमाणूस असं काही बोलू शकेल. खंडेलवाल इतके खुश झाले की त्यांनी अक्षरशः टाळ्या वाजवल्या. डॉ. अग्रवाल इकडे तिकडे बघत "मैं क्या बोलू? व्हॉट कॅन आय स्पीक?" असे म्हणू लागले. मी म्हटले, "आप मुझसे बात कर ही नही सकते, क्यूँकी आपकी उतनी लेव्हल ही नहीं है!" मी म्हटलं-"मैं ही आप से बात नहीं करना चाहती! लेकिन मैं जरूर आपको ये सुनाना चाहती हूँ, और याद दिलाना चाहती हूँ, कि एक महिला का आपने इस तरह से अपमान किया और आप जिन के हाथ के नीचे काम कर रहे है, वह भी तो एक महिला ही हैं। (महाराष्ट्राच्या वैद्यकीय सेवा संचालक त्यावेळेला चंद्रिकापुरे म्हणून बाई होत्या.) एक महिला के नीचे काम करने में आप को शरम नही आती, और एक महिला के साथ बात करने में आपको शरम आती है। तो बहुत गलत है ये बात ध्यान रखो!" एवढे बोलून मी निघून आले. माझ्या आईवडिलांनी मला लहानपणी हेही सांगितलं होतं की जेव्हा आपला शेवटचा क्षण येईल, तेव्हा तुमचा पूर्ण जीवनपट तुमच्या डोळ्यासमोर उलगडत जाईल, त्यावेळेला तुम्हाला असे वाटायला नको की, आपण ही चुकीची गोष्ट केली. त्यावेळेला मला खरंच असं वाटलं, की हा माझा नाही तर सर्व स्त्रियांचा अपमान आहे. एवढे बोलून मी घरी निघून गेले. पुढे काय झाले मला माहिती नाही. पण नंतर मी जेव्हा हे घरी पिताजींना सांगितलं, तेव्हा ते म्हणाले, राणी कदाचित तुझा अपमान करण्याचा त्यांचा हेतू नसेलही. डॉ अग्रवाल हे मारवाडी समाजातले आहेत. त्या पुरुषांना स्त्रियांशी बोलायचा संकोच होतो. तसे आमचे पिताजी अगदी साधे होते. मी त्यांना दोष देणार नाही. पण अग्रवालांच्या बाबतीत तो त्यांचा संकोच नव्हता एवढे मात्र नक्की. इथे मारवाडी समाजातील अनेक जण असतील. आमचा उल्हास ही मारवाडी समाजाचा आहे. पण मी म्हटले तो माणूस एका बाईच्या हाताखाली काम करतोय. तो उपसंचालक आहे. आणि मला बोलावून घेतल्यावर माझ्याशी बोलत नाही, हे कसे? त्याच्यानंतर गंमत कशी बघा, नियतीचे फासे वेगळे पडतात. तोच माणूस आम्ही 'सर्च'मध्ये असताना एकदा आमच्याकडे आला. डॉ. कुनावर नावाच्या दुसऱ्या एका जणासोबत. म्हणाला - "मॅडम, आप से मुझे माफी मांगनी है।" मी म्हटलं - "क्यूँ? उस दिन तो आप बहुत बदतमीजी से पेश आये थे!" तो म्हणे, "नाही. मी विचार केला त्याच्यावर. मी असं वागायला नको होतं." असे इतके अनुभव येतात, एक स्त्री म्हणून जगत असताना... अशा प्रसंगांमध्ये आपण आपली शक्ती टिकवून ठेवली पाहिजे.

त्यानंतर आम्ही गडचिरोलीला गेलो. तिथेही खूप खूप विविध प्रकारचे अनुभव घेतले! गडचिरोली म्हटलं की सगळ्यांच्या डोळ्यासमोर नक्षलवादी उभे राहतात. एक दोन गोष्टी त्यांच्याविषयी सांगते. सुरुवातीलाच आम्ही गेलो तेव्हा मोठा पूर आला होता. जूनमध्ये आम्ही गेलो. जुलैमध्ये खूप मोठा पूर. ऑगस्टमध्ये खूप मोठा पूर. हगवणीची खूप मोठी साथ. आम्ही ओआरएस (Oral rehydration solution) बनवून गावामध्ये जायचो, तर लोक आम्हाला बघून आपली दारे बंद करून घेत. कोणीच आमच्याकडून औषधोपचार करायचे नाहीत. तीन दिवस सलग हा प्रकार सुरू, शेवटी चौथ्या दिवशी लोक आमच्याकडे यायला लागले. मी तिथल्या लोकांना विचारलं, की हा चमत्कार कसा झाला? तर त्यांनी सांगितलं की, नक्षलवादी गावात आले आणि आम्हाला खूप रागावले. म्हणाले, आम्ही बघतो आहे की ती बाई तीन दिवसापासून पावसात येत आहे, आणि तुम्ही तिच्याकडून काही इलाज का करून घेत नाही? तुम्ही इलाज घेतलाच पाहिजे. त्यांच्या भीतीने ही माणसं आमच्याकडे येऊ लागली. मग त्यांना फायदा व्हायला लागला आणि मग थोडंथोडं बरं वाटायला लागलं!

मग हळूहळू आम्ही ठरवलं की इथे जर आपल्याला आरोग्याचं काम चालू करायचं असेल, तर ह्यांच्याशी संवाद केला पाहिजे. मग तिथल्या पन्नास-साठ आदिवासी गावातल्या पुजाऱ्यांना गोळा केलं. तिथल्या ४०-५० गावांचा, म्हणजे एका इलाक्याचा जो पुजारी असतो त्याला 'मांझी' म्हणतात. त्याला आणि आदिवासींच्या काही नेत्यांना सोबत घेतलं. त्या सर्वांसह आम्ही रात्रीच्या अंधारामध्ये मशाली घेऊन गावात जायचो आणि तिथे शेकोटी पेटवून त्याच्या भोवती बसून चर्चा करायचो. आदिवासींना ह्या गोष्टीचं अतिशय अप्रूप वाटायचं.



मी लहानपणी नृत्य शिकलेली आहे. आणि त्यामुळे जेव्हा मी त्यांच्यासोबत नाच करायची तर त्यांना खूप आनंद व्हायचा, एक डॉक्टरीणबाई आमच्या सोबत नाच करते!

सुमारे दोन वर्ष ही चर्चा केली. त्यातूनच विषय निघाला की तुम्ही हॉस्पिटलमध्ये का जात नाही? तुम्हाला कशा पद्धतीचं हॉस्पिटल हवं? त्यावर त्यांनी ज्या सूचना दिल्या, तशा पद्धतीचं हॉस्पिटल आम्ही तिथे बनवलं. उदारहणार्थः ते म्हणाले की तुम्ही डॉक्टर लोक रुग्णालयात पांढरे कपडे घालता, आमच्या मुडद्याला आम्ही पांढऱ्या कपड्यात गुंडाळतो. तुमच्याकडे आल्यावर आम्हाला वाटतं की मुडद्यांकडून कसा इलाज करवणार? त्यामुळे तुम्ही पांढरे कपडे घालायचे नाही. मग ते म्हणाले की बहुतेक रुग्णालये दोन-तीन मजली असतात, तिथे गेल्यावर आमचे जमिनीशी नातं तुटतं आणि जमिनीपासून दूर गेल्यावर आम्ही बरे कसे होणार? त्यामुळे बैठं रुग्णालय बांधा. मग ते म्हणालेत की, बहुतेक ठिकाणी असं असतं की, पेशंट अंदर, रिश्तेदार बाहर! थोडा वेळच डॉक्टर्स किंवा नर्सेस पेशंटला पाहतात आणि नातेवाईकांना बाहेर हाकलून देतात. तुमच्याकडे जागा आहे तर तुम्ही ती आम्हाला द्या. आम्ही आमची माणसं, आमचं सामान आणू. आमच्या कुट्या आम्ही बनवू आणि अक्षरशः आमचं रुग्णालय उभारण्याआधी दोन गावातल्या लोकांनी झोपडी उभारूनही दिली. लेखामेंढा हे बरंच गाजलेलं गाव आहे. दुसऱ्या एका गावातल्या लोकांनी त्यांच्याही झोपड्या बांधल्या आणि म्हणाले की, आमचे पेशंट याच्यामध्ये राहतील.

मग त्यांनी म्हटलं की या दवाखान्याचं नाव माँ दंतेश्वरी दवाखाना पाहिजे, आणि इथे दंतेश्वरी मातेचं मंदिर पाहिजे. माझी तर देवीवरती प्रचंड श्रद्धा आहे. पण अभयला ते फारच विचित्र वाटत होतं, हे काय! दंतेश्वरी मातेचं नाव, आणि मंदिर. मग ते म्हणाले की आजकालच्या दवाखान्यांमध्ये तुम्ही डॉक्टर लोक स्वतःलाच देव समजता, पण आम्ही ते नाही मान्य करणार. आमची आमच्या देवावर श्रद्धा आहे, त्यामुळे पहिले आम्ही आमच्या देवीला नमस्कार करू आणि मग आम्ही तुमच्या दवाखान्यात येऊ! दंतेवाड्याची देवी ही गोंड आदिवासींची देवी आहे. म्हणजे ओडिशा, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्र, आदिलाबादपर्यंत जे गोंड लोक आहेत, त्यांची ती सर्वात मोठी देवी. तिथून ती मूर्ती आणली. पुजारीही तिथलेच आले. त्यांनीच प्राणप्रतिष्ठा केली. मंदिराचं उद्घाटनही त्यांच्या माजी पुजाऱ्यांनीच केलं. त्या भाषणामध्ये ते म्हणत होते की, "हा दवाखाना पंतप्रधानांचा नाही. राष्ट्रपतींचा नाही. अभय बंगचा नाही. राणी बंगचा नाही. हा आमचा दवाखाना आहे." तर त्यांना ते आपलं वाटत होतं तर मग आम्ही त्या दंतेश्वरी मातेच्या निमित्ताने दरवर्षी त्यांची जत्रा भरवू लागलो. त्या जत्रेचं स्वरूपही आम्ही बदललं. त्याला आम्ही आरोग्यजत्रा म्हटलं. पहिल्या दिवशी त्यांच्या आरोग्याच्या प्रश्नांवरती चर्चा करायची. त्यांच्या आरोग्याचे कोणते महत्त्वाचे प्रश्न आहेत ते त्यांनी मतदान करून निवडायचं आणि ते प्रश्न आम्ही घ्यायचे. त्यांनी सांगितलं, मलेरिया. आमची मुलं मरतात, आम्ही पुरुष दारू पितो, आम्हाला पाठ-कंबर दुखी आहे. याच्या बाबतीत तुम्ही काहीतरी करा. ह्यावर, आमचे विचार त्यांच्यावर न लादता त्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्या पद्धतीने आम्ही काम सुरू केलं. त्याचा खूप चांगला परिणाम व्हायला लागला. पण खूप खेड्यांमध्ये जावं लागायचं. दुसरीकडे नक्षलवादी प्रचंड सक्रिय होते. एकही दिवस असा जायचा नाही, की जेव्हा नक्षलवाद्यांनी काही घडवलं नाही. कुठे बॉम्बस्फोट झाला, तर कुठे बंद आहे! जज, सुरुवातीला पाच सहा वर्ष मी रोज खेड्यांमध्ये जाताना ॲम्बुलन्सने जायचे. मग त्यांनी ते पाहिलं, आणि निरोप पाठवला, की रात्री गाडीच्या आतमध्ये तुम्ही लाईट लावत जा, म्हणजे आम्हाला कळेल की ही सर्चची गाडी आहे. (आम्ही ती उडवणार नाही.) एक दोनदा असंही झालं की त्यांचा बंद होता आणि त्याही वेळी गंभीर रुग्णांना भेटायला मी गेले. तर

त्यांनी असा निरोप पाठवला की अजिबात यायचं नाही अशा वेळी. चुकून आमचा ट्रिगर दाबला गेला तर, तुम्ही इतकं चांगलं काम करता. तर असे त्यांचे चांगले अनुभवही आम्हाला आले. कधीकधी अश्या खेड्यांमधले लोक सर्चला 'चर्च' म्हणायचे आणि हे ख्रिश्चन लोकांचं काम समजायचे, कारण त्यांनी तेच पाहिलं होतं. दुसरे हे दोघे अमेरिकेतून आले म्हणजे हे लोक गोरे आहेत, असेही ते समजायचे. कित्येक गावांमध्ये लोक टक लावून बघायचे की ही गोरी दिसते का? मग मला जाऊन सांगावं लागायचं की, की बघा मी नाही आहे बाहेरची. मी याच जिल्ह्यातली आहे, माझा इथलाच जन्म आहे. मी कुंकू लावते. मी ख्रिश्चन नाही. आणि हे चर्च नाही, सर्च आहे सर्च! त्यांच्याकडून ते वदवून घ्यावं लागायचं. खूप मजेदार काळ होता तो.

मी स्वतः एक स्त्रीरोगतज्ज्ञ असल्यामुळे, माझ्या रुग्णालयात मी नेहमी स्त्रीरुग्णांना बघायचे. भारत सरकारचा एक कार्यक्रम होता त्यावेळी – 'माता आणि बाल आरोग्य' (Maternal and Child Health) म्हणजे गरोदरपण, बाळंतपण आणि कुटुंबनियोजन. कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम हा भारतातील लोकसंख्यानियंत्रणासाठी होता आणि त्याचा खूप मोठा पगडा आपल्या आरोग्यव्यवस्थेवर होता. त्यासाठी लक्ष्यपूर्ती महत्त्वाची होती. लक्ष्य दिले जायचे. त्यांचा पूर्ण भर हा संख्येवर होता, म्हणजे इतके ट्युबेक्टॉमी आणि इतके व्हॅसेक्टॉमी, पण त्यांची गुणवत्ता काय आहे, काहीच माहीत नाही. त्यामुळे तो कार्यक्रम लोकांना आपला वाटायचाच नाही. त्यांना तो सरकारचाच काहीतरी कार्यक्रम वाटायचा. दुसरी गोष्ट अशी होती की जेव्हा मी अभ्यास केला त्यावेळेला, लक्षात आलं की, केंद्र शासनाचा जेवढा अर्थसंकल्प होता, त्यातला दोन तृतीयांश खर्च हा कुटुंबनियोजनावर जात होता. गावातल्या ज्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आधारस्तंभ म्हणजे परिचारिका, त्यांनाच नव्हे तर शाळेतील शिक्षकांनाही बाकीची सर्व कामं सोडून फक्त कुटुंबनियोजनाचंच काम करावं लागायचं. त्यामुळे इतर स्त्रियांच्या आणि लहान मुलांच्या आरोग्याकडे पूर्ण दुर्लक्ष होत होतं. बरं, इतका पैसा खर्च करून काही फरक घडत होता का? त्यावेळेला भारताचे आरोग्य सेवा महासंचालक डॉ हरचरण सिंग हे होते. त्यांना मी जाऊन भेटले. त्यांनी मला सांगितलं की "राणी, एकामागून एक पंचवार्षिक योजनांमध्ये इतका पैसा खर्च होत आहे, पण जन्मदरामध्ये काहीही फरक झालेला दिसत नाही" आरोग्य ह्या विषयाची शासनाची समज त्यावरून लक्षात येत होती. स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून माझ्या लक्षात यायचं की, शासनाचा भर हा फक्त गरोदरपण, बाळंतपण आणि कुटुंबनियोजन एवढाच आहे. माझ्या अनुभवानुसार, वयात येणाऱ्या मुलीपासून तर म्हाताऱ्या बाईपर्यंत, तिच्या मृत्यूपर्यंत, ज्याला आपण स्त्रीरोग म्हणतो, तो काही ना काही होत असतो. कोणाला मासिक पाळीचा त्रास आहे, कोणाला वंध्यत्वाची समस्या आहे, कुणाला लैंगिक समस्या आहे, कुणाला पदर जाण्याची समस्या आहे, ह्या प्रश्नांविषयी काहीच केलं जात नव्हतं.

मी अमेरिकेत असताना National Library of Medicine हे जगातलं सर्वात मोठं ग्रंथालय वॉशिंग्टनमध्ये आहे, तिथे सर्व साहित्यामधून कॉम्प्युटराईज संशोधन केलं तर माझ्या हे लक्षात आलं की गावाच्या पातळीवर किती स्त्रियांना स्त्रीरोग होत आहेत, हे दाखवण्यासाठी जगात एकही अध्ययन उपलब्ध नाही. मग मी विचार केला की गडचिरोलीला जाऊन ह्या विषयावर काम करायचं. हॉपकिन्समध्ये असताना तिथे माझे प्रोफेसर होते कार्ल टेलर. ते भारतात राहिले होते. पंजाबमध्ये त्यांनी काम केलं होतं. त्यांना पदर जाणं हे माहीत होतं. ते फार उत्साही होते माझ्या या कामाला मदत करायला. हॉपकिन्सच्या नियमानुसार प्रत्येक विद्यार्थी त्याच्या विषयानुरूप एकेका प्रोफेसरसोबत जोडला जायचा. मी स्त्रीरोगतज्ज्ञ असल्यामुळे एका स्त्रीरोगतज्ज्ञाशी जोडलेली होते. त्यांचं नाव होतं प्रोफेसर जोसेफ विलार. ते मूळचे अमेरिकन नसून मेक्सिकन होते. मला सारखं त्यांच्याकडे जावं लागायचं. जोसेफ विलार कधीही मला दिलेली वेळ पाळायचे नाहीत. मी जेव्हा जेव्हा जायची, तेव्हा तेव्हा ते मला जवळपास हाकलूनच द्यायचे. मग मी कंटाळून स्वतःच्या मनाने डॉ. टेलरची मदत घेतली आणि प्रकल्प पूर्ण केला. मी ICMR म्हणजे Indian Council of Medical Research मध्ये जेव्हा हे सारं मांडलं, तेव्हा सगळे मला हसायला लागलेत. म्हणे काय हा मूर्खपणा आहे! तू या स्त्रियांच्या आरोग्यावरती फालतू कशाला वेळ घालतेस? तू दुसरं काहीतरी चांगलं कर, म्हणजे ज्याच्यामुळे तुझं नाव होईल. असे हे सर्व शास्त्रज्ञ, धोरणकर्ते वगैरे मला असं म्हणायचे. पण तरीही मी गडचिरोली जिल्ह्यात गेल्यानंतर तिथल्या स्त्रियांशी बोलू लागले. तिथल्या शंभर जाणकार स्त्रिया निवडल्या, ज्यांना आम्ही इन्फॉर्मर्स (Informers) म्हणतो इंग्लिशमध्ये. त्यांना म्हटलं की तुमचे एक-दोन-तीन-चार-पाच-सहा आरोग्याचे प्रश्न तुम्ही मला सांगा. त्यामध्ये शंभर टक्के बायांनी पदर जाणं, पांढरं पाणी जाणं हा आमचा एक नंबरचा आजार आहे हे सांगितलं. हॉपकिन्समध्ये आणि आयसीएमआर मध्ये मला सांगण्यात आलं होतं की पदर जाणं काय आहे म्हणे! सर्दी झाली की शेंबूड वाहतो तसा पदर जातो बायांना. असं म्हणणारे बहुतेकजण पुरुष होते हे सांगायला नकोच. बायांनी जे आजार सांगितले होते त्या दहा पंधरांची मी यादी बनवली. आणि मग मी त्यांना म्हणाले की याच्या तुम्ही तीन याद्या करा. सर्वात गंभीर स्वरूपाचे आजार, मध्यम स्वरूपाचे आजार, आणि सौम्य स्वरूपाचे आजार. मला आश्चर्याचा धक्का बसला.

त्या खेड्यातल्या बायांनी अडलेलं बाळंतपण आणि मूलबाळ न होणं, हे दोन्ही गंभीर आजार म्हणून टाकलं. अडलेल्या बाळंतपणात आई मरते, आणि डॉक्टर लोकांसाठी जिथे रुग्ण मरतो तो गंभीर आजार.

पण वंधत्वाची समस्या वेगळी. त्यात काही बाई मरत नाही. म्हणून मी त्यांना विचारलं की तुम्ही दोन्ही एकत्र का टाकलं? तर त्या खेड्यातल्या बायांनी मला इतकं मार्मिक उत्तर दिलं, त्या मला म्हणाल्या **"बाई, अडलेलं बाळ असेल तर बाई एकदाच मरते, पण मूलबाळ होत नसेल तर मात्र ती रोजच्या रोज मरणयातना भोगते. हा समाज तिला जगू देत नाही." ग्रामीण भागातील त्या बाया मला म्हणाल्या, की "बाई, आपल्याकडे वांझोटी हा शब्द आहे. वांझोटा हा शब्द नाही."** मग मी जिद्दीनं ठरवलं, की मला याचा अभ्यास करायचाच आहे आणि तो अभ्यास अतिशय शास्त्रीय पद्धतीने पूर्ण केला. खूप गावांच्या लोकांचे सहकार्य आम्हाला त्यात मिळालं. चंद्रिकापुरे बाई त्या अभ्यासाच्या उद्घाटनासाठी आल्या होत्या. ब्याण्णव टक्के स्त्रियांना आपण ज्यांना स्त्रीरोग म्हणू तसे आजार होते. एका बाईला तर त्यातील चार प्रकारचे आजार होते. फक्त आठ टक्के बायांनी कधीतरी औषधोपचार घेतला होता. मग मला असं वाटलं की, जर्नलमध्ये प्रकाशित करण्यापूर्वी, ज्या स्त्रियांवरती हे संशोधन केलं आहे, त्यांच्यापर्यंत ते न्यायला पाहिजे. मग आठ मार्चला आम्ही 'स्त्री आरोग्य जागरण जत्रा' काढली. गडचिरोली जिल्ह्यातल्या सर्व तालुक्यांमध्ये आणि काही मोठ्या गावांमध्ये आम्ही गेलो. त्यामध्ये आम्हाला अनेक संस्थांनी मदत केली, शुभदा देशमुख आणि सतीश गोगुलवार ह्यांनीही केली. आमचे तिथले दोन आदिवासी आमदारही आमच्यासोबत होते. ती पूर्ण जत्रा गावातल्या लोकांनीच आयोजित केली होती. आम्ही त्यासाठी पोस्टर्स बनवली. तुम्ही सर्वजणांनी शेफ विष्णू मनोहर ह्यांचं नाव ऐकलं असेलच. त्यांचे वडील हे प्रसिद्ध चित्रकार आणि आमचे खूप जवळचे मित्र. त्यांनी खूप सुंदर पोस्टर्स, लोकांना समजतील अशा सोप्या भाषेत बनवली होती. अशा पोस्टर्सचे प्रदर्शन जत्रेत लावले होते. गावातले लोकच इतरांना त्याबद्दल समजावून सांगायचे.

स्त्रियांच्या आरोग्याविषयी मी बोलायची. नंतर मासिक पाळी ह्या विषयावर पुरुषांसाठी स्लाईड शो असायचा. अठ्ठेचाळीस टक्के स्त्रिया विविध प्रकारचे संसर्ग आणि गुप्तरोग ह्यांनी पीडित होत्या. त्याच्याविषयी पुरुषांना माहिती देण्यासाठी हे स्लाईड शो होते. संध्याकाळी आम्ही बसवलेल्या एका नाटकाचा प्रयोग होत असे. मला स्वतःला नाटकात काम करायला आवडतं. मी मेडिकलला असताना करत असे. तर आमच्या नाटकाचं नाव होतं, "नवरा गरोदर राहतो' आमचा सगळा स्टाफ अगदी ड्रायव्हरसकट - आम्ही मिळून ते नाटक बसवलं. त्याची कथा अशी होती-

**अचानक एका पुरुषाच्या लक्षात येतं की तो गरोदर आहे. आणि मग खूप बायांना जो प्रचंड त्रास होतो मळमळ, उलटी होणं किंवा थकवा येणं, ते त्याला होतं. इतक्यात त्याची सासू येते, तिला कळतं की आपला जावई गरोदर आहे. मग ती सासू त्याच्यावर अनेक बंधनं घालते. गावांमध्ये खूप असतं, हे नाही खायचं - ते नाही खायचं, हे गरम आहे, हे थंड आहे असं म्हणते. खूप कष्टाची कामं करायला लावते. कारण काय तर त्याने बाळंतपण सुलभ होईल. ह्या सर्वांने तो परेशान झालेला असतो. बाळंतपणाची वेळ येते तेव्हा डॉक्टर म्हणतात की याचं सिझेरिअन करावं लागेल. त्यासाठी रक्ताची गरज लागते. एकही जण रक्त द्यायला तयार नसतो.** ह्या कल्पना मला कुठून सुचल्या, तर मी हे सारं पाहिलं आहे. अनुभवलं आहे. मी गडचिरोलीच्या नागरी रुग्णालयात होते, तेव्हा रक्तपेढी वगैरे काहीच नव्हती, मी सिझेरिअन करायची तर नवरे मला लिहून द्यायचे की माझी बायको मेली तरी चालेल, पण मी एक थेंब रक्त द्यायला तयार नाही. काही पुरुष तर मला पैसे आणून द्यायचे, की हे घ्या बाई पन्नास शंभर रुपये. एखादं कोंबडं बकरं विकत घ्या आणि द्या रक्त. काही तर म्हणायचे, बाई तुम्हीच सांगता ना माझी बायको रीयस आहे. मरू द्या ना मग, मी दुसरी बायको करून टाकतो. तर असे पण अनुभव यायचे. तर इथे त्या नवऱ्याच्या बाळंतपणासाठी त्याची बायको समोर येते आणि ती रक्त देते त्याला. त्यानंतर दुर्दैवाने (!) त्याला मुलगी होते. ह्यावर मात्र सासू प्रचंड चिडते. ती येतच नाही. त्या मुलीला बघतच नाही. जावयाला खूप टोमणे मारते. मुलगी आपल्या आईला कशीबशी समजावते. मग सासू येते आणि जावयाला म्हणते ठीक आहे, आता मी काही व्रतवैकल्ये उपवास वगैरे सांगणार, हे निष्ठेनं, नियमितपणे करायचं. पुढच्या वेळेला मुलगाच व्हायला पाहिजे. तो म्हणतो "बाप रे! एका बाळंतपणात मी एवढा थकून गेलो, आता मला दुसरं बाळंतपण अजिबात नको!" तेव्हा ती बायको नवऱ्याला सांगते की तुम्ही काळजी करू नका मी सिझेरिअनच्या वेळेसच मी तुमचं फॅमिली प्लॅनिंगचं ऑपरेशन करून टाकलं आहे!

हे नाटक इतकं म्हणजे इतकं गाजलं. अक्षरशः बाया आपल्या नवऱ्यांना ओढून ओढून आणायच्या, की नाटक बघा. खदाखदा हसायच्या. आमचे जे आदिवासी आमदार होते सुखदेव बाबू आणि हिरामणजी, ते आमच्या सोबतच असायचे. त्या दोघांनी म्हटलं की, बाळ जन्माला येतानाचं संगीत, आणि इतर सारं करायचं. नाटक चांगलं रंगलं पाहिजे. **त्यांच्यातला**

**एक आमदार म्हणे की यातल्या गरोदर पुरुषाची भूमिका मी करणार! मी विचारलं का? तो म्हणाला, त्याने इतका लोकप्रिय होईन की पुढच्या निवडणुकीला बायांची भरपूर मतं मिळतील मला.** मग रात्री कीर्तन असायचं. सगळं करत असताना वाटलं की पुरुष हे गुप्तरोग वगैरे काय बघतील. पण ते बघायचे. ते माझ्याकडे यायचे आणि मला म्हणायचे की "बाई हा तुम्ही अभ्यास फक्त बायांवरती का केला?" तुम्ही आमच्यावरती पण करा. मी म्हटलं नाही हो, बायांना खूप त्रास असतो. तर ते म्हणायचेत - "नाही! आम्हाला पण त्रास असतो. आम्हाला हायड्रोसील आहे. लघवीत जळजळ होते, आमचं धात जातं. तुम्ही आमच्यावरची अभ्यास करा." मी म्हटलं, अभ्यास करायचा असेल तर मला गावातील सर्व पुरुषांचाच करावा लागेल. तर तुम्ही सह्या गोळा करून आणा. आश्चर्य म्हणजे, तीन दिवसात चार खेड्यातल्या पुरुषांनी सह्या गोळा करून आणल्या. तो माझ्यासाठी इतका आनंदाचा क्षण होता की, काय सांगू. ज्या समाजामध्ये लैंगिकतेविषयी बोलणंच अभद्र, अश्लील मानलं जातं, तिथे पुरुष समोर येतात आणि मला म्हणतात की अशा पद्धतीचा अभ्यास करा. त्याच्यानंतर मी तो अभ्यास केलाही. तो Lancet मध्ये प्रकाशित झाला. आणि तो जगातला अशा प्रकारचा पहिला अभ्यास मानला जातो.



हा अभ्यास प्रकाशित झाल्यानंतर, जगभरातल्या वेगवेगळ्या संघटनांनी, स्त्री संघटनांनी आणि मग जागतिक आरोग्य संघटना, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद ह्यांसारख्या संस्था, सर्वांनीच तो उचलून धरला. मग मला वेगवेगळ्या ठिकाणी बोलवण्यात यायचं. आता काही मजेदार अनुभव तुम्हाला सांगते. **'बालकांच्या अधिक चांगल्या आरोग्यासाठी' (म्हणजे महिला आणि मुले ह्यांच्या आरोग्यासाठी, लोकसंख्या नियंत्रणासाठी नाही.) कुटुंब नियोजनाच्या विविध पद्धती असायलाच पाहिजे.** ह्या अभ्यासामध्ये आणि पूर्वी एक स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणूनही, नेहमीच आमचा असा अनुभव असतो की आपल्या समाजामध्ये ह्या विषयांवर कधी बोलले गेले नाही तरी, विवाहपूर्व किंवा विवाहबाह्य लैंगिक संबंध अतिशय कॉमन आहेत. पण ज्याप्रमाणे जमिनीवरचा कचरा सतरंजीखाली लपवला की वरून कसं छान छान दिसेल, तसंच ह्या बाबतीत होतं.

गैरआदिवासी खेड्यांमध्ये आम्ही अभ्यास केला, त्यातून माझ्या हेही लक्षात आलं की जवळजवळ ५० टक्के मुलींचे विवाहपूर्व लैंगिक संबंध होते. आणि त्यामुळे केवळ मुलींना नाही तर मुलाला सांगणं आवश्यक आहे. कारण बहुतेकदा लैंगिक शिक्षण हे मुलींना दिल्या जातं, "तू स्वतःला सांभाळ, तू सुरक्षित रहा." त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचणंही आवश्यक आहे. म्हणून किशोरावस्थेत लैंगिक आरोग्यावर मुली व मुलांना शिक्षण दिले गेले पाहिजे. त्यांच्यामध्ये जे काही स्त्रीशरीरासंबंधी प्रश्न असतात त्याचा उपचार असला पाहिजे. आपल्या देशामध्ये १९७२ सालापासून गर्भपाताचा कायदा आहे, तुम्ही इतक्यात ऐकलं असेल की, यात बरेच बदल करण्यात आले. पण भारतातला हा जो गर्भपाताचा कायदा आहे हा अतिशय "उदारमतवादी" ज्याला म्हणतो तसा आहे. म्हणजे पाच महिन्यापर्यंत गर्भपात करता येऊ शकतो, आणि तीन महिन्यापर्यंत एका डॉक्टराच्या सहीने आणि तीन ते पाच महिन्यापर्यंत दोन डॉक्टरांच्या सही/संमतीने तो करता येऊ शकतो. गडचिरोली जिल्ह्यात, कायदेशीर गर्भपात करू शकणारी मी पहिली डॉक्टर होते. रोज पाच-सहा तरी रुग्ण माझ्या डोळ्यासमोर मरायचे. कोणी मेलेलेच आणायचे. गर्भपात केलेला आहे गर्भाशयात काडया घातलेल्या आहेत, कधी दुसरे काही उपचार केले आहे, त्याच्यामध्ये स्त्रिया, तरुण मुली, परित्यक्ता, विधवा सगळ्या असायच्या. मग मी दाईचे प्रशिक्षण करायला लागले तेव्हाची गोष्ट! एकदा एका शिबिरामध्ये एका आदिवासी सुईणीने मला बाजूला नेलं, ती म्हातारी होती. मला म्हणे, "बाई तुला या गर्भपातासाठी काहीतरी केलंच पाहिजे!" तिने मला सांगितलं की गावागावांमध्ये गावठी

गर्भपात करणारे असे quack (भोंदू डॉक्टर) असतात. ते सायकलवर, मोटरसायकलवर खेड्यापाड्यांत जातात. घरी गर्भपात करतात. त्यांची फी काय असते? तर पैसे तर ते घेतातच! पण त्यासोबत जिचा गर्भपात करतात तिच्यासोबत गर्भपात करण्याच्या आधी आणि गर्भपात केल्यानंतर लैंगिक संबंधही करतात. ज्या देशामध्ये गर्भपाताचा कायदा १९७२ सालापासून आहे, त्या देशातील खेड्यांमध्ये स्त्रियांची इतकी विपरीत स्थिती आहे तर! मग माझ्या लक्षात आलं की सारी गर्भपात केंद्रे ही मोठ्या शहरात आहेत. कायदेशीर गर्भपात आणि बेकायदेशीर गर्भपात ह्यांना काही अर्थ नाही. लोकांसाठी काय महत्त्वाचे आहे? सेवा उपलब्ध असणे किंवा उपलब्ध नसणे. त्यामुळे मग तिथे मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे आणि इतर डॉक्टरांचे प्रशिक्षण करणे, या गोष्टी सुरू केल्या. हे खरं म्हणजे त्या सुईणीने माझ्या लक्षात आणून दिलं. बाईची इज्जत हे गावठी लोक किंवा डॉक्टर लोक किती धुळीला मिळवून टाकतात! मी जेव्हा हे स्त्रियांसोबत बोलायला लागले, गावागावांमध्ये मीटिंग घ्यायला लागले तर बाया आम्हाला म्हणू लागल्या की - "बाई तुम्ही डॉक्टरीन बाई आहात आणि आम्ही सर्व काही तुमच्याकडे येऊ शकत नाही. तर तुम्ही असं करा की आमच्या ज्या गावच्या दाई आहेत त्यांना तुम्ही ट्रेनिंग द्या. त्या आमची तपासणी करतील आणि याच्यावर उपचार करतील." मी तर हबकूनच गेले. या खेड्यातल्या अशिक्षित म्हाताऱ्या सुईणींना कसं शिकवणार? त्यांच्याशी कसा संवाद साधणार? त्यावेळेला पहिल्यांदा मी, अनौपचारिक शिक्षण पद्धती काय असते, पाउलो फ्रेइरेच्या पद्धती काय आहेत, हे वाचायला सुरुवात केली. चित्रांच्या , खेळांच्या माध्यमातून कसं आपण यांना प्रशिक्षण द्यावं हे शिकू लागले आणि खरं सांगते, त्यावेळेला माझी दृष्टी अशी बोगद्यासारखी होती. मी एक चांगली स्त्रीरोगतज्ज्ञ होते. पण बाकीचं काडीचंही ज्ञान मला नव्हतं, हे त्या सुईणींचं प्रशिक्षण करताना मला कळलं. आता या दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांची जबाबदारी आमच्यावर होती. त्यामुळे दर महिन्याला त्यांच्या बैठका व्हायच्या. पहिल्याच बैठकीला मी गेले तेव्हा जिल्हा आरोग्य अधिकारी आणि त्यांचे सहायक असे दोघे होते. सर्चच्या वतीने मी होते. साऱ्या सिस्टर्स, नर्सेस, अंगणवाडी ताई सतरंजीविना खाली बसलेल्या होत्या. अधिकारी प्रत्येक जणाला उभे करून विचारायचे- "हाऊ मेनी ट्युबेक्टॉमी? हाऊ मेनी? हाऊ मेनी? हाऊ मेनी?" म्हणजे लक्ष्य- टार्गेट; आणि मग त्यांनी ते पूर्ण केलं नसेल तर खूप रागवायचे. (मी आज माफी मागते मी खुर्चीत बसले आहे आणि तुम्ही खाली बसलेले आहात, पण थोडासा माझ्या कमरेचा आणि गुडघ्याचा त्रास आहे.)

मी त्या अधिकाऱ्याला म्हणाले की दुसऱ्या वेळेला सर्च ऑफिसमध्ये बैठक घेऊ आणि ती मला चालवू द्या. त्या दिवशी आम्ही सर्व गोलात बसलो. मी त्यांना विचारायची, शासनाचं लक्ष्य तुम्ही कसं व कुठवर पूर्ण केलं? चांगलं काम केलं असेल तर त्यांचं कौतुक केलं. कुणाचं काम चांगलं नसेल झालं तर, काय अडचणी आहेत? कशा सोडवता येतील? अशा पद्धतीने ती बैठक छान झाली आणि ती संपल्यानंतर ते अधिकारी मला म्हणाले - "मॅडम! माझ्या आयुष्यातली सगळ्यात बोअरिंग बैठक होती ही!" मी म्हटलं, "असं का म्हणता? छान तर झाली." मग ते म्हणाले "दोन-तीन नर्सेस तरी रडल्या पाहिजेत, म्हणजे माझी बैठक यशस्वी झाली!" म्हटलं, "काय?" - तर माझा हा सॅडीस्टिक प्लेझर आहे म्हणे. मी म्हटलं "ह्या नर्सेस म्हणजे माझे हात पाय आहेत. यांच्यासाठी मी काम करते. त्यांच्यासोबत मी असं दुष्ट प्रवृत्तीने वागले तर कसं होणार आहे?" आणि म्हणून सुईणीचे प्रशिक्षण करताना, मी सुईणींना अट घातली की, मी तुम्हाला काही शिकवणार, त्याच्या बदल्यात तुम्ही मला काहीतरी शिकवायचं! मला झाडांमध्ये रुची आहे म्हणून मग आम्ही प्रत्येक सत्रात झाडांची माहिती घ्यायचो. इथे सुनंदाताई बसलेली आहे. ही मला तिथून मिळाली. त्याही प्रशिक्षणात सुनंदाने खूप मोठी मदत केली.

एक दिवस एका शिबिरात सुईण मला म्हणाली, "बाई या झाडाचा उपयोग नवऱ्याला मारण्यासाठी करायचा" मी चकितच झाले. म्हटलं, "नवऱ्याला का मारायचं?" ती मग फटाफट सांगायला लागली - तो मुजोर असेल, त्याचं कोणासोबत लफडं असेल, आपलं कोणासोबत लफडं आहे ह्या कारणासाठी त्याचा काटा काढायचा असेल तर.... त्या मला भराभर घटना सांगायला लागल्या की जिथे बायकांनी नवऱ्याला मारलं. मी तर आचंबित झाले. घरी येऊन अभयला म्हटलं, "हा काय विचित्र प्रकार आहे?" अभय म्हणे, "तू बोल ना त्यांच्याशी, जास्त बोल म्हणजे तुला कळेल" आणि मग माझ्या लक्षात आलं, अरे या स्त्रिया वर्षानुवर्ष जंगलाच्या सान्नीध्यात राहिल्या आहेत. मग पुढची दोन वर्ष मी पूर्ण गडचिरोली जिल्ह्यात फिरले. लोकांकडून प्रत्येक झाड अगदी मुळापासून ते बीपर्यंत समजून घेतलं. त्याचे घरात उपयोग, आर्थिक-व्यावसायिक उपयोग आणि औषधी उपयोग. मग माझ्या लक्षात आलं की स्त्रीच्या जीवनातली जी महत्त्वाची नाती आहेत - पती-पत्नीच नातं, प्रियकर-प्रेयसीचं नातं, भाऊ-बहिणीचं नातं, सासू-सुनेचं नातं, दीर-भावजयीच नातं, दोन बहिणींच नातं - ह्या सर्व नात्यांची झाडांसोबत वर्णने आहेत. त्याच्या भोवतीची गाणी आहेत, कथा आहेत. हे सर्व मी माझ्या आवडीखातर डॉक्युमेंट केलं. एक

दिवस आमचे मित्र ग्रंथालीचे प्रकाशक दिनकर गांगल घरी आले. त्यांनी ते सारे कागद पाहिले, आणि ते मला म्हणाले की "राणी आपण ह्यातून एक पुस्तक बनवू." मी म्हटलं, "नाही! मी काही लेखिका वगैरे नाही, मी सहज आवडीखातर केलंय हे!" ते म्हणे, "नाही !आपण याचं पुस्तक करू या!" ते पुस्तक त्यांनी प्रकाशित केलं "गोईण" नावानी. "गोईण" म्हणजे मैत्रीण. त्या 'गोईण'ला राज्य शासनाचा उत्कृष्ट साहित्याचा पुरस्कार मिळाला. आणि खरंच मी खूप नम्रतेने सांगू इच्छिते की. मी वनस्पतिशास्त्रज्ञ नाही, मी मानववंशशास्त्रज्ञ नाही. हे जे काही मी शिकले ते त्या सुईणीने मला शिकवलं. इतर बायकांनी मला आणखी बरंच शिकवलं. गंमतच व्हायची. समजा मी हॉस्पिटलमध्ये बसलेली आहे, माझ्यासमोर एक म्हातारी येऊन बसली. मी तिला विचारते की, "बाई तुला काय त्रास आहे?" ती मला दोन बोटं दाखवते. तोंडाने एक शब्दही बोलत नाही. मी चार-पाचदा विचारते आणि मला वैताग येतो. "तुम्ही बाया किती मूर्ख, तुम्हाला समजत नाही का? तुम्ही बोलल्या नाही तर आम्हाला कसं कळणार?" आणि मग ती बाई माझ्या खोलीतून निघून जाते. ती बाई निघून जाते, तेव्हा दोन घटना घडतात. एक तर तिच्या आरोग्याचा प्रश्न जी ती मला सांगत होती, त्याचा उपचार घेतल्याशिवाय ती गेली. दुसरं असं की, आधुनिक वैद्यकशास्त्रावरचा तिचा पूर्ण विश्वासच उडाला. ती काय सांगत होती मला की, ही दोन बोटं म्हणजे तिचे अंग बाहेर येतं! तिथं काम करत असताना माझ्या लक्षात आलं की खेड्यापाड्यांमध्ये त्यांचे वेगळे शब्द आहेत. वेगळे वाक्प्रयोग आहेत. त्यांची चिह्नांची भाषा आहे. मी जेव्हा दक्षिण अमेरिकेमध्ये आणि आफ्रिकेमध्ये अनेक ठिकाणी गेले. तिथे मी पाहिलं तिथल्याही म्हाताऱ्या बायांचे, अंग बाहेर येते हे सांगण्यासाठी तेच चिह्न होते. आम्हाला हे मेडिकलमध्ये कधी शिकवलं नाही. मी दवाखान्यामध्ये बसते आणि एखादी येते आणि म्हणते - "बाई, खैरा धरला" मग आता खैरा धरला म्हणजे काय, तर गर्भाशयात, गर्भाशयाचा उजव्या पायावर ताण पडून दुखणं. एखादी बाई येते आणि म्हणते, - बाई मला मामा भाचीचा त्रास झाला." आता मामाभाचीचं दुःख काय आहे? तर बाळंतपणानंतर गर्भाशय आकुंचन पावतं, आणि तेव्हा जे दुखतं त्याला मामाभाचीच दुखणं म्हणतात. म्हणजे आम्ही जे शरीररचनाशास्त्र आणि शरीरक्रियाशास्त्र, रोगविज्ञान वगैरे शिकलो त्याबाबत खेड्यातल्या कल्पना पूर्णपणे वेगळ्याच आहेत, ज्याला आम्ही इथनो-ॲनॅटॉमी, इथनो- फिजिओलॉजी म्हणतो. तर छाती आणि पोट यांच्यामध्ये डायफ्राम, पडदा असतो याची त्यांना कल्पनाच नाही. त्यांना असं वाटतं की सर्व महत्त्वाची इंद्रिय पोटामध्ये आहेत आणि म्हणून बाळ जन्माला आलं की, ते वर पटकन ओढून काढलंच पाहिजे. मासिक पाळी जास्त गेली पाहिजे असं ते मानतात, कारण ती कमी गेली तर तो गोळा होतो आणि मग ती बाई मरते. वास्तविक मासिक पाळी जास्त जाणं हा आजार आहे, कमी जाणं नाही.

आम्ही एकदा त्यांना विचारलं होतं की – "बाळंतपणामध्ये आम्ही लोहाच्या गोळ्या देतो, तर तुम्ही त्या का फेकून देता?" एकदा सुईणीना प्रशिक्षण देताना विचारलं - "कधी मेलेला बाळ जन्माला आला का?" त्या म्हणे कधीच मेलेलं बाळ आमच्याकडे जन्माला आलेलं नाही. मला वाटलं ह्या खोट्या बोलत आहेत बाया! मेलेलं बाळ कधी ना कधी जन्माला आलंच असेल. मग मी परत खोलात गेले. "निरोगी बाळ व आजारी बाळ तुम्ही कसे ओळखाल?" त्या म्हणाल्या, जे खूप लठ्ठ बाळ आहे, वजन जास्त आहे, ते आमच्या दृष्टीने आजारी बाळ! जे रोड-रोड आहे ते सुदृढ बाळ!" म्हणजे आपण जे कुपोषण (माल न्यूट्रिशन) वगैरे म्हणतो त्याच्या एकदम उलट उत्तर. आम्हाला मेडिकल कॉलेजमध्ये बाळंतपण जेव्हा होतं, त्याविषयी तीन गोष्टी शिकवल्या असतात की, बाळ - ज्याला आम्ही पॅसेंजर म्हणतो, गर्भाशयाचं तोंड आणि खालचा कटीचा भाग - ज्याला पॅसेज म्हणतो आणि तिसरं - पॉवर, पॉवर म्हणजे गर्भाशय आकुंचन पावतं आणि कळा येतात. पण खेड्यापाड्यांमध्ये पॉवरची कन्सेप्टच नाही. पॅसेज आणि पॅसेंजर, मी त्यांना विचारलं, "तुम्ही असं का म्हणता?" आणि मग त्यांनी मला सांगितलं की, त्यांच्यामध्ये अशी समजूत आहे की बाळ स्वतः हालचाल करत बाहेर येतं. त्यांनी मला दोन गोष्टी सांगितल्या - तुम्ही आम्हाला मेलेल्या पिंडाविषयी विचारता, पण मेलेला पिंड गर्भाशयात राहिल्यावर तो बाहेर कसा येईल? त्यामुळे तो जिवंतच बाहेर आला पाहिजे. आल्यानंतर एक दोन सेकंदात तो मरेल. त्या त्यांच्या दृष्टिकोनातून सांगत होत्या आणि माझ्या विचारानुसार किंवा शिक्षणानुसार मला ते खोटं वाटत होतं .

त्या मग म्हणाल्या, "तुम्ही आम्हाला लोहाच्या गोळ्या देता आणि म्हणता की तू ह्या गोळ्या खा. तुझं बाळ पोसेल. आम्ही कशा खाणार गोळ्या? आम्ही फेकूनच देणार." त्यांच्या मते लठ्ठ लोक आळशी असतात. त्यांना पटकन हालचाल करता येत नाही. रोड माणसं कशी तरतरीत असतात. जर रोड बाळ पोटात असेल तर ते भरभर भरभर हालचाल करत बाहेर येतं. मग त्या सुईणींनी मला शिकवलं, आता याच्यानंतर आपण औषधोपचार करताना बायकांना सांगायचं, की लोहाच्या गोळ्यांनी तुझं रक्त बनेल म्हणून. बाळाचं नावही नाही घ्यायचं. पांढऱ्या कॅल्शियमच्या गोळ्यांनी तुझी हाडं मजबूत होतील. जोपर्यंत आपण त्यांची भाषा, ते काय बोलतात ते समजून घेणार नाही, तोपर्यंत ह्या कामाला यश येणार नाही. केवळ आपण हसलो व हे मूर्ख, अडाणी, अशिक्षित लोक आहेत त्यांना काय समजतं,

असं बोललो तर त्यांचा आपल्यावर कधीच विश्वास बसणार नाही. एखाद्या बाईला मूलबाळ होत नसेल तर ती हे तोंडाने कधीच सांगत नाही. ती जास्तीत जास्त असं म्हणते, "माझी काळी महाभारी जात आहे. तर हे शिकणं जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत आधुनिक वैद्यक आणि पारंपरिक श्रद्धा ह्यांच्यामध्ये पूल बांधता येणार नाही. ही होती माझ्यासाठी फार मोठी शिकवण! त्यांनी स्त्री-पुरुषांच्या समजुतींबद्दल मला जे जे सांगितलं ते सर्व मी "कानोसा" म्हणून एका पुस्तकात संकलित केलं आहे.

स्त्रीरोगतज्ज्ञांसारखी तपासणी कशी करावी ह्याबाबत आम्ही ८५ खेड्यातल्या १२५ सुईणींना प्रशिक्षण दिलं. ह्या सर्वजणी प्रशिक्षण दिलेल्या जगातल्या पहिल्या सुईणी आहेत. हे सर्व आम्ही आमच्या पातळीवर करत होतो आता दुसरीकडे दोन गोष्टी घडत होत्या. एकतर भारत सरकारच्या आईसीएमआरने (Indian Council of Medical Research) आपले धोरण बदलले, व प्रजनन आरोग्याचे धोरण नवीन आणले. त्यासाठी नवीन विभाग सुरू केला आणि त्याच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणी म्हणून त्यांनी मला बोलावलं. आणि तो कार्यक्रम त्यांनी दिल्लीला न करता, गोव्याला (पणजी) केला. स्त्रियांच्या क्षेत्रात काम करणारी भारतभरातली अनेक मंडळी तिथे होती. गंमत अशी झाली की आम्ही गेलो तर सुरुवात करायला थोडा उशीर झाला. म्हणून डॉक्टर सक्सेना, आयसीएमआरचे महासंचालक मला म्हणाले की, "आपण आधी दिल्लीच्या जवळच्या मेरठ मेडिकल कॉलेजच्या स्त्रीरोगशास्त्राच्या पद्मश्री मिळालेल्या प्रोफेसर आहेत. (ज्या राजीव गांधीच्या अगदी जवळच्या असून) त्यांनी कुटुंब नियोजनाचं खूप काम केलं आहे, त्यांना आपण अगोदर बोलायला देऊ आणि मग चहा झाल्यानंतर तुझं सत्र ठेवू." त्या बाई इतक्या शिष्ट होत्या! त्या बोलायला उठल्या, त्यांनी माझा 'लॅन्सेट'मधला संपूर्ण शोधनिबंध त्यांनीच हे काम केलेलं असल्याच्या थाटात, स्वतःच सादर करून टाकला. सर्वजण इतकी चुळबुळ करू लागले की, हे राणीनी केलेलं काम आहे. त्यांनी आम्हा कोणालाच किंवा लॅन्सेटलाही श्रेय दिले नाही. सक्सेना इतके चिडले! ते चहा घेताना मला म्हणाले, "मी या बाईची चांगली खरडपट्टी काढतो." मी म्हटलं, "तुम्ही काहीच बोलू नका. मला माझ्या पद्धतीने हे काम करू द्या." मी बोलायला उभी राहिले तेव्हा मी सांगितलं की "मी ह्या बाईंची खूप आभारी आहे. त्यांनी माझं काम एकदम सोपं करून टाकलं आहे. आपला वेळही वाचला आहे. आता आपण आता सरळ चर्चेला सुरुवात करू! मी बाईंना विनंती करते की त्यांनीही माझ्यासोबत यावे. कारण त्यांनी माझा पेपर बारकाईने वाचलेला आहे."

डॉक्टर राजाराम म्हणून पाँडिचेरीच्या Jawaharlal



Institute of PostGraduate मेडीकल Education and Research (JIPNER) प्रोफेसर होते. बाईंचे बालरोगतज्ज्ञ पतीही त्यांच्यासोबत होते, डॉक्टर राजारामनी त्यांना म्हटलं की तुझ्या बायकोने फार मोठी चूक केली आणि तिने मॅडमची माफी मागायलाच पाहिजे. त्यांनी मला दुपारी त्यांच्या हॉटेलच्या खोलीत बोलावलं. मी तिथे गेले तर त्या म्हणतात, "हा तुमचा शोधनिबंध आहे हे मला माहितीच नव्हतं!" मी म्हटलं, "पण त्याच्यावर माझं नाव लिहिलेलं आहे." त्यावर त्या म्हणतात, की, "बंग हे अमेरिकन नाव आहे. हे भारतीयांचं कसं असेल?" मी म्हटलं की "तुम्ही त्या 'अमेरिकन बंग'लाही धन्यवाद नाही दिले, तुम्ही लॅन्सेटलाही धन्यवाद नाही दिले." तर त्या माझ्याकडे पाहतच राहिल्या. (मी अशी म्हणजे अशीच असते. आज जरा मी कार्यक्रमाला जायचं, माहेरी जायचंय म्हणून अशी छान साडी नेसून आलेली आहे. पण मी एरवी सगळीकडे साधी, नेहमीसारखीच जाते). म्हणे, "तुम्ही तर तशा वाटत नाही". मी म्हटलं, "म्हणजे काय म्हणायचं आहे तुम्हाला?"."तुम्ही खरंच का डॉक्टर आहात? तुम्ही तशा वाटतंच नाही हो. एवढा अभ्यास करून शोधनिबंध तुम्ही लिहिला असेल म्हणून..." मी म्हटलं, "होय! नसेन दिसत मी

तशी, पण हे काम मीच केलं आहे!" मग तिचा नवरा मला 'सॉरी' म्हणाला. पण त्या बाईंनी मला 'सॉरी' म्हटलंच नाही; काय मजेदार अनुभव, नाही का?

मला जर आधी कोणी सांगितलं असतं, की असं काही घडतं, तर मी कधीही विश्वास ठेवला नसता. पण माझ्या बाबतीत घडलं खरं. आयसीएमआरच्या नंतर जागतिक आरोग्य संघटनेने प्रजनन आरोग्याचा विशेष विभाग सुरू केला आणि त्याच्या उद्‌घाटनला मला जिनेव्हाला बोलावलं. उद्‌घाटनाच्या दिवशी जोसेफ विलार माझे जे हॉपकिन्सचे प्रोफेसर (ज्यांनी मला कधी एक मिनिटाचाही वेळ दिला नाही) तेथे आले होते. त्यांना कळलं की राणी बंगच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे. ते आले. त्यांनी सर्वांसमोर मला मिठी मारली, जवळ घेतलं आणि सांगू लागले "ह्या माझ्या विद्यार्थिनी आहेत. त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली अभ्यास केला आहे. त्यांनी जबरदस्त काम केलं आहे!" मग मी त्यांना हळूच म्हटलं "डॉक्टर जोसेफ विलार, तुमच्या लक्षात आहे का, मी अनेकदा जेव्हा तुम्हाला भेटायला येत असे, तेव्हा तुम्ही मला एक मिनिटही दिलेला नाही. का, तर मी एका गरीब, विकसनशील देशातून आले म्हणून. माझ्या जागी जर एखादी अमेरिकन असती, तर तुम्ही तिला वेळ दिला असता. पण आता आज तुम्हाला भेटून मला आनंद होतोय!" नंतर म्हटलं, "याच्यानंतर मात्र असं कोणाला करू नका!" **'यू डोन्ट लुक लाईक दॅट!' हे वाक्य मला अनेक ठिकाणी ऐकावं लागतं.**

आता त्याच जागतिक आरोग्य संघटनेत २००२ मध्ये जागतिक आरोग्य सभा भरली होती. हे प्रसंग याच्यासाठी सांगते की जीवनात काय झेलावं लागतं तुम्हाला! तर त्या सभेत जगभरातल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्य देशांच्या आरोग्य मंत्र्यांना बोलावतात. त्यावेळी प्रथमच त्यांनी मला म्हणजे एका अशासकीय संस्थेच्या व्यक्तीला वक्ता म्हणून बोलावलं. तेही उद्‌घाटनाच्या सत्रामध्ये. जागतिक आरोग्य संघटनेत एक भारतीय बाई काम करायची. मी जिनेव्हाला अनेकदा जायची, तेव्हा तिची माझी भेट होत असे. मी हॉलमध्ये जाण्याच्या आधी, ती माझ्याकडे आली आणि मला म्हणाली की,"राणी तुझ्यासाठी आरोग्यमंत्री, सचिव ह्या सर्वांकडून एक निरोप आहे. भारत सरकारच्या विरुद्ध इथे काहीही बोलू नको! जर बोललीस तर तुझी गचांडी पकडतील." वास्तविक भारत सरकारविरोधी तिथे बोलायचा काही प्रश्नच नव्हता. मी माझ्या मुद्द्यांवर बोलणार होते. मग मी तिला म्हटलं की, "सुमन, पहिली गोष्ट तर तू हा निरोप माझ्यासाठी आणायलाच नको होता, पण एवीतेवी आणलाच आहेस, तर त्या भारतीय शिष्टमंडळाला सांग की, इथे मी भारताची प्रतिनिधी म्हणून आलेली नाही, उलट तुम्हीच भारताचे प्रतिनिधी म्हणून आलेले आहात. मी पूर्ण जगभरातल्या स्त्रियांची प्रतिनिधी म्हणून आली आहे आणि मला जे योग्य वाटेल ते मी बोलणार. त्यावर तुमचा अधिकार नाही." लोक असे विक्षिप्तपणे वागतात! त्यानंतर उद्‌घाटनाच्या सत्राला आणि पुढचे तीन दिवस परिषदेत मी भारतीय शिष्टमंडळाला एकदाही पाहिलं नाही. मी विचारायची, "ते कुठे आहेत?" लोक सांगायचे, - "ते खरेदीला गेले आहेत!"

या नंतर अजून दोन-तीन घटना मला सांगायच्या आहेत. आमचं दारूमुक्तीचं आंदोलन सुरू झालं. बाया मला म्हणू लागल्या की, "पहिल्यांदा हे सांग की माझ्या नवऱ्याची दारू कशी सुटेल? तुझे आरोग्य वगैरे बाजूला राहू दे!" आणि दारूमुक्ती आंदोलनात अक्षरशः आम्ही ओढले गेलो. पुढची पाच वर्षं त्याच्यात लोकांनी आम्हाला नेतृत्व बहाल केलं, त्या काळामध्ये सुरुवातीला दारू विकणारे दुकानदार लोक आम्हाला खूप हसायचे. त्यांची लॉबी खूप मोठी असते. नंतर मात्र त्यांना थोडा धोका वाटू लागला. मग ते खूप शिव्या-धमक्या देत मला फोन करायचे की, "पहा बरं तुझ्यावर आम्ही बलात्कार करू! तुझी मुलं शाळेत जातात त्यांना आम्ही मारून टाकू." मी म्हणायची, "तुम्हाला जे करायचे ते करा!" आणि त्यांचं बलात्कार करु- बलात्कार करू सुरूच होतं, मी त्यांना म्हटलं, "तुम्ही माझ्या शरीरावर बलात्कार करू शकता, पण माझ्या मनावर तुम्ही कधीच बलात्कार करू शकणार नाही. माझं मन पवित्रच राहणार. तुम्ही माझ्यावर बलात्कार केला तर मी ओरडून-ओरडून सांगेन की, ह्यांनी माझ्यावर बलात्कार केला. पण मी सक्षम उभी राहीन तुमच्यासमोर." बाहेर जाताना, काम करताना, शिक्षणानिमित्त, कामानिमित्त, आपण स्त्रिया, मुली बाहेर जातो, तेव्हा ही भीती नेहमी आपल्याला वाटत असते, हे मी अनुभवलेलं आहे. शेवटी हेच उत्तर दिलं, "जे करायचं आहे ते करा!" एकदा अभय बाहेर गेला होता, अमेरिकेत की कुठे तरी. साठ दारूदुकानदारांनी आपले संघटन बनवलं. त्यांचे अध्यक्ष, सचिव ह्यांनी आमच्या ऑफिससमोर बैठक घेतली आणि माईक आमच्या दिशेने लावला, नक्षलवाद्यांची भाषा ते बोलू लागले - आम्ही मारून टाकू, कापून टाकू, तुकडे करू वगैरे! दारू दुकानदारांचा अध्यक्ष काँग्रेसचा मोठा लीडर. तो जिल्हा परिषदेचाही अध्यक्ष होता. त्याचे वडील स्वातंत्र्यसैनिक होते. त्या दिवशी रात्री साधारणपणे बारा वाजता तो आला, आमचं घर नेमकं गावाच्या बाहेर होतं आणि आणि घरात आम्ही तिघेजण. मी, आनंद आणि अमृत. ती पोरं दोघं लहान. बेल वाजली म्हणून मी दार उघडलं. तर 'तो' माणूस होता. तो चांगला धिप्पाड माणूस होता. आता मी चांगलीच जाड झालेय. पण आधी अशी नव्हते. तर मी त्याला पाहून घाबरले. मला वाटलं आपलं छोटंसं गाव आहे, हा काही तरी वाईट उद्देशाने

आलाय, पण तरीही मी त्याला आत बोलावलं. म्हटलं, "बसा! काय काम आहे तुमचं?" तो म्हणाला, "इथून चार किलोमीटर अंतरावर एक खेडं आहे, तिथे आमच्या दारूदुकानात काम करणाऱ्या मुलाची बायको बाळंतीण झाली. तिची आणि त्या नवजात बाळाची तब्येत अतिशय खराब आहे तर तुम्ही चला बघायला!" मला वाटलं, हा सापळा तर नसेल! मी त्यांना म्हटलं, "तुम्हीच घेऊन या त्यांना" ते म्हणाले की, "नाही, मी कसं आणणार? त्यांची परिस्थिती कठीण आहे. तुम्ही सोबत चला" तर मला काय करावं कळेना! माझी परमेश्वरावर श्रद्धा आहे. आतमध्ये जाऊन आमच्याकडे कृष्णाची मूर्ती होती, तिच्यासमोर उभी राहिले आणि म्हणाले की, 'आता मी काय करू?' आणि मग माझ्या मनानेच मला सांगितलं की तू या वेळेला डॉक्टर आहेस. जिथे तुला डॉक्टर म्हणून बोलावतात, तिथे तुझं कर्तव्य आहे डॉक्टर म्हणून जाणं. मग मी आनंदला उठवलं आणि सांगितलं की मी जातेय. जर चार पाच तासात परत नाही आले तर पोलीस नियंत्रण कक्षाला तू फोन कर. मी नियंत्रण कक्षाचा नंबर त्याला दिला. आनंद इतका शहाणा, तो मला म्हणाला, "अम्मा, तू जा. काही काळजी करू नको, मी अमृतची काळजी घेतो." त्या दारू दुकानदाराकडे स्कूटर होती, तो मला म्हणाला की स्कूटरवरती जाऊ, मी म्हटलं नाही! आपण पायी जाऊ. माझ्या हातामध्ये टॉर्च, स्टेथोस्कोप आणि बॅग. काळाकुट्ट अंधार आणि जंगल... पूर्णवेळ माझ्या मनात हेच विचार होते की आता हा मला काहीतरी करेल, मला मारेल किंवा माझ्यावर अतिप्रसंग करेल. माझ्या टॉर्चचा उपयोग कसा करेन, माझ्या स्टेथोस्कोपचा उपयोग कसा करेन, असं माझं सुरू होतं. आधी ह्या अशा धमक्या द्यायचे म्हणून मग मी कराटेचे ४-५ हात शिकून घेतले होते. एक शब्द न बोलता आम्ही पोचलो, खरंच तिथे पेशंट होता. ते बाळ आणि बाळंतीण आजारी होते. मग मी त्यांना तिथे जे काही सांगायचं ते सांगितले आणि दोन-तीन दिवसांनी आणायला सांगितलं. आम्ही परत घरी आलो. मग त्या माणसाने मला विचारलं की, "मॅडम! तुमची फी?" मी म्हटलं "तुम्हाला तर माहित आहे मी काही खाजगी प्रॅक्टिस करत नाही." मग तो निघून गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशीपासून तो माणूस सगळ्या गावात सांगू लागला की, "मी आदल्या दिवशी संध्याकाळी इतक्या धमक्या दिल्या पण तरी त्या बाईने मला घरात घेतलं त्या माझ्यासोबत आल्या आणि त्यामुळे आता यांचे चारित्र्यहनन करणे आणि धमक्या देणे बंद!" तो माझ्याकडे आला आणि म्हणे, "डॉक्टरसाहेब आल्यानंतर तुम्ही आमच्या घरी या." त्यांनी आम्हाला घरी जेवायला बोलवलं. सर्वजण आम्हाला म्हणत होते - "जाऊ नका बरं! ते तुम्हाला काहीतरी विष वगैरे देतील." पण आम्ही म्हटलं – जाणार! आम्ही गेलो. मजेत जेवण झालं. तो खोजा समाजाचा होता.

एक पत्रकार होता. त्याला खूप पैसे देऊन हे लोक आमच्याविरुद्ध भडकवत होते. त्या पत्रकाराने त्याच्या घरी महालक्ष्मीला आम्हाला मेहुण म्हणून बोलावलं... तर मनुष्य स्वभावाच्या अशा कितीतरी तऱ्हा बघायला, अनुभवायला मिळतात. माझ्या आयुष्यातला तो अतिशय शिकवणारा अनुभव होता. लहानपणापासून संस्कार असेच की हे चांगलं, हे वाईट! अगदी काळं आणि पांढरं असल्याप्रमाणे! चांगलं-वाईट, सत्य-असत्य, बस एवढंच! आणि मी पण माणसांचं विभाजन असंच करायचे, हा माणूस चांगला, हा माणूस वाईट! पण मला पहिल्यांदा वेगळा अनुभव आला की माणूस चांगला किंवा वाईट नसतो, तर तो चांगला अधिक वाईट असतो. त्याचा स्वार्थ जेव्हा दुखावला जातो, तेव्हा तो वाईट बनतो. हा माझ्या जीवनातील खूप मोठा धडा मला मिळाला. **आमचं दारुबंदीचं आंदोलन वगैरे झालं, त्याच्यानंतर ते सारे दारू दुकानदार आमच्या घरी आले आणि म्हणाले की, "आपकी पहुच बहुत है, मुख्यमंत्री तक है, हमारे शराब के दुकान तो चले गये. अब हमको कोई एज्युकेशनल इंस्टीट्युशन देने के लिए कहें" मी म्हणाले, "आमचा असा काहीही प्रभाव नाही आणि असं काही मिळणार नाही." तर ते म्हणे - "हमने ऐसा कॅल्कुलेशन किया कि इसमे जादा पैसा मिलता है शराब की दुकानसे!"**

नागरी रुग्णालयात आम्ही काम करत होतो, तेव्हा एकदा आमचे जिल्हा शल्यचिकित्सक आणि निवासी वैद्यकीय अधिकारी यांनी, जिल्हाधिकारी आणि एका दुसऱ्या स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने नेत्र तपासणी शिबिर घेतलं. तिथे तीस शस्त्रक्रिया झाल्या. माझा या सगळ्याशी काही संबंध नव्हता. माझे स्त्री आरोग्यावर संशोधन सुरू असल्यामुळे मी खेड्यात असे. एकच दिवस रुग्णालयात जायची. तिसऱ्या दिवशी जेव्हा रुग्णांच्या डोळ्यावरील पट्ट्या उघडल्या गेल्या तेव्हा त्यांच्या लक्षात आले की ३० पैकी १२ जण पूर्णपणे आंधळे झालेले आहेत. त्या सर्वांच्या डोळ्यात पू झाला होता. बाकीच्यांनाही त्याचा संसर्ग झाला. त्यांनी मग जिल्हाधिकाऱ्याशी चर्चा केली. ते म्हणाले की हे सर्व प्रकरण दाबून टाकू या. आता आम्हीही दोघे जण आहोत तर आम्हाला विश्वासात घेतलं पाहिजे. म्हणून मग ते दोघेजण पहिल्यांदा अभयकडे आले. अभय बोलला की काय करायचं ते राणीशी पण बोलायला पाहिजे, मी म्हटलं की - "नाही, हे तुम्हाला दाबता येणार नाही! याची चौकशी व्हायला पाहिजे." कारण जेव्हा त्यांनी मला हे सांगितलं त्या दिवशी त्याच ऑपरेशन थिएटरमध्ये ६० लॅप्रोस्कोपिक ट्युबेक्टॉमी (दुर्बिणीतून केलेली स्त्री नसबंदी) होणार होत्या. तिथे दोन ऑपरेशन थिएटर्स होती.



एकामध्ये ही शिबिरे व्हायची व  दुसरं नियमित वापरासाठी होतं. तर मी म्हटलं, की "हे तुम्हाला कळवावं लागेल. त्या बारा लोकांवर  तुम्हाला उपचार करावा लागेल." त्यांच्याकडून मला असंही कळलं की, कोरची तालुक्यात त्यांनी ज्या ८ जणांवर शल्यक्रिया केल्या, आणि ते सर्व जण आंधळे झाले आणि त्यांना घरी पाठवून दिलं होतं. मग दोन दिवसांनी सर्व वर्तमानपत्रांमध्ये मथळे! तुम्ही सर्वांनी वाचलं असेल त्या काळामध्ये - "डॉक्टर राणी बंग यांनी जबरदस्तीने ऑपरेशन थिएटरमध्ये घुसून गर्भपात केले आणि म्हणून रुग्णांना संसर्ग झाला आणि  हे सर्व रुग्ण आंधळे झालेत." माझा यात काडीचाही संबंध नव्हता.

गंमत अशी की, नेत्रशिबिराच्या दोन दिवस आधी आमच्यात एक लोकमतचा पत्रकार होता त्याच्या वहिनीचा अर्धवट गर्भपात झाला होता. मी खेड्यातच होते. ती बाई भरती झाली.  तिचा रक्तगट आरएच निगेटिव्ह होता, तिला रक्तस्राव होत होता. म्हणून तिला तिच्या गावातून चंद्रपूरला पाठवण्यात आलं होतं, पण त्यानंतर तिथले डॉक्टर  म्हणाले - बंग मॅडम आहेत, तर तुम्ही तिकडेच जा. मग त्या रात्री ते, सिव्हील सर्जन, आरएमओ,  आर एच ब्लडग्रुप ज्यांचा आहे त्यांना आणि त्या स्त्रीरोगतज्ज्ञ हे सर्वजण रात्री बारा वाजता आमच्या घरी आले. मला म्हणाले की – "असा असा पेशंट आहे, तर तुम्ही सकाळी या आम्ही सर्व तयार ठेवतो, तुम्ही तिचे इव्हॅक्युयेशन करा. अर्धवट गर्भपात झाला आहे." मग  सकाळी मी गेले. नुसती तिथे उभी होते. त्या आरएमओनीच अनेस्थेशिया दिला. त्या स्त्रीरोगतज्ज्ञानीच ते इव्हॅक्युयेशन केलं. ती बाई दुसऱ्या दिवशी घरी चालत गेली. आणि त्यांनी असं उठवलं की मी ऑपरेशन थिएटरमध्ये  जबरदस्तीने घुसून गर्भपात केला म्हणून सगळे लोक आंधळे झालेत. हे सर्व इतकं  भयानक होतं! त्यावेळेलाही अभय कुठेतरी बाहेर गेला होता. पण रोज पेपरमध्ये त्या बातम्या यायच्या. आता बाहेरच्या लोकांना कुठे काय माहीत  होतं! गडचिरोलीच्या आणि रुग्णालयाच्या लोकांना सर्व माहीत होतं, पण कोणी बोलत नव्हते. कारण त्यामध्ये मोठमोठे लोक - जिल्हाधिकारी वगैरे - सामील होते. मी असा विचार केला की, आता चौकशी समिती नेमताच सत्य बाहेर येणारच आहे. त्यामुळे आपण कशाला काय बोलायचं? मला ऊठसूट रस्त्यावरती कोणीही – "मी पत्रकार आहे मॅडम, किती जणांना तुम्ही मारलं? किती जणांना आंधळं केलं?" असं विचारायचे. माझे वडील आले  भेटायला. म्हणाले,  "राणी असं कसं केलं तू?" मी म्हटलं "मी काहीच केलं नाही!" मला खूप वाईट वाटलं. माझी वहिनी आली. मला म्हणाली -"अग बाई! राणीताई, १२ जणांना तुम्ही आंधळं केलं?" ... कारण सगळे तेच वाचत होते. मला अस वाटलं की माझी बाजू येईल तेव्हा मी मांडेन. मी माझं काम सुरू ठेवलं. सर्व पत्रकारांना त्यांनी विकत घेतलं. सर्वांचे जीवन विमे काढले. त्या काळामध्ये आमच्यावरती लिहायचे, विधानसभेत प्रश्न विचारण्यात आले. चहूबाजूंनी आमच्यावरती टीका सुरू होती.

शेवटची बस रात्री बारा वाजता यायची. आमचं घर बसस्टॉपपाशी होतं. एक दिवस रात्री दार वाजलं, तेव्हा परत अभय कुठेतरी बाहेर, जपानला गेला होता. मी दार उघडलं तर दोन तरुण मुलं होती. मी म्हटलं कोण आहे? तर एक जण म्हणाला "आम्ही मुंबईहून आलोत. इंडियन एक्स्प्रेस ग्रुपकडून. मी जर्नालिस्ट आहे आणि हा फोटो जर्नालिस्ट. आम्ही इथलं जे आय स्कॅन्डल झाले त्याची पूर्ण चौकशी करायला इथे आलेलो आहोत. आम्हाला तुमचा पत्ता देण्यात आला,  तुमच्या घरी आमची राहण्याची सोय होऊ शकते का?" कारण गडचिरोलीला काही हॉटेल वगैरे नव्हतं. मला इतका आनंद झाला. बरं झालं कोणीतरी आलं. मग ते आमच्या घरी राहिले. रोज सकाळी उठून

नाश्ता करून जायचे, रात्री येऊन झोपायचे. तीन दिवस ते फिरले आणि चौथ्या दिवशी मी ऑफिसमध्ये बसून असताना, माझ्याकडे ते अकरा वाजता आले आणि मला म्हणाले, "मॅडम आमचं काम झालं, आम्ही आता मुंबईला जातो." मी इतकी चिडले! म्हणाले, " माझ्यावरती हा सारा गुन्हा टाकला जातोय, तुम्ही पत्रकार मंडळी माझ्याशी एक शब्दही न बोलता जाऊच कसे शकता? म्हणे आमची चौकशी पूर्ण झाली! अशी कशी तुमची चौकशी पूर्ण झाली?" तर मग ते म्हणाले की, ते बाहेर बघा तुमच्या हॉलमध्ये सारे पत्रकार, डॉक्टर लोक बसलेले आहेत.

गंमत अशी झाली की, गडचिरोलीतल्या नक्षलवाद्यांचे जे सर्वोच्च नेते होते, त्यांनी इंडियन एक्स्प्रेस मुंबईला फोन केला आणि त्यांना म्हटल की, ती बाई पूर्णपणे निर्दोष आहे, हे आम्हाला माहिती आहे. तुम्ही ताबडतोब त्या बाईला न्याय दिला पाहिजे. तुम्ही जर दिला नाही, तर आम्ही आमच्या पद्धतीने दोषी व्यक्तींना 'न्याय' देऊ. (म्हणजे त्यांचं मुंडकं कापू!) त्यांनीच आम्हाला तुमच्या घरी यायला सांगितलं. आम्ही या सर्वांना हा निरोप सांगितला तेव्हा कुठे ते सर्वजण पोपटासारखे बोलायला लागले. खरं काय झालं ते सांगितलं! याच्याशी मॅडमचा काही संबंध नाही आणि आता मी स्टोरी करणार आहे. हे सगळे लोक आम्हाला निरोप द्यायला इथे आलेले आहेत."

खरंच सांगते, मी नक्षलवाद्याचं अजिबात समर्थन करत नाही. कारण हिंसेने कुठलाच प्रश्न सुटू शकत नाही. हिंसेने हिंसाच वाढते, पण तीही माणसंच आहेत. आपल्याला वाटतं की नैतिकता आपल्यातच आहे पण काही जणांना काही वेळेला काही गोष्टी पटून जातात. माझ्यासाठी ते इतकं महत्त्वाचं ठरलं, ती स्टोरी नंतर प्रकाशित झाली, शासनाचा अहवालही आला त्या ऑपरेशन थिएटरमध्ये काम करताना वापरलेली सर्व उपकरणं दूषित होती. ते डॉक्टर्स, सिस्टर यांना निलंबित करण्यात आलं. त्या काळात मला इतका मनस्ताप भोगावा लागला, पण नक्षलवाद्यांनी मला हात दिला मात्र, हा एक वेगळाच अनुभव होता.

असेच आणखी दोन तीन अनुभव सांगते. अचानक एकदा मला गोव्याच्या मॅजिस्ट्रेट कडून ईमेल आला की, आमच्याकडे लैंगिक अपव्यापारामध्ये चार अल्पवयीन मुलीना पकडलेलं आहे, आणि त्या गडचिरोलीच्या आहेत असं म्हणतात. आम्ही तुमचं नाव ऐकलंय, तुम्ही कृपया चौकशी करण्यासाठी या. मग मी आणि सुनंदा तिकडे गेलो. चौकशी करताना आमच्या लक्षात आलं की खरंच त्या मुली गडचिरोलीच्या होत्या. त्या विषयाच्या आणखी खोलात जायला लागल्यावर हे खूप मोठं षडयंत्र असल्याचं लक्षात आलं. पूर्वी मुली गायब झाल्या तर असं समजायचे की नक्षलवाद्यांकडे गेल्या. पण दिल्ली, मुंबई, गोवा, हैदराबाद, हरियाणा, पंजाब, चंद्रपूर असा मोठा व्याप होता त्याचा. मग आम्ही पोलिसांकडे गेलो. आम्ही स्वतः प्रथम माहिती अहवाल(एफआयआर) दाखल केला. आमचे पोलीस अधीक्षक तो दाखल करून घ्यायला तयार नव्हते, म्हणे मॅडम, तुम्ही महाराष्ट्र भूषण आहात. ही खूप मोठी बातमी होईल. त्याने समाजात वावटळ उठेल. मी म्हटलं आपण याला पब्लिक न्यूज करायचीच नाही. पण ह्या मुलींना न्याय मिळाला पाहिजे आणि हे सर्व अंदर गेले पाहिजेत. खालच्या न्यायालयात त्या प्रकरणात आमच्या बाजूने निवाडा झाला. अनेक मुलींना आम्ही सोडवून आणलं. त्यानंतर ते लोक उच्च न्यायालयात गेले. तेथेही आमच्याच बाजूने निवाडा झाला. हाही खूप वेगळाच अनुभव आम्हाला होता.

दुसरं एक वेगळं चित्र आम्हाला बघायला मिळालं. आमच्याकडे दरवर्षी नरबळी दिल्याच्या २-३ तरी घटना ऐकायला मिळायच्या. मला आठवतं की, आमचीच एक सुईण आहे, तिच्या मुलांना नरबळी देण्यात आलं होतं. ती मला रडून रडून सांगायची. म्हणे आदिवासी समाजामध्ये असं होतं की, नरबळीसाठी बाहेरचा कोणी नाही मिळाला तर ते आपल्याच घरातल्या मुलाला देतात आणि नरबळी दिल्यानंतर जे रक्त असतं, त्या रक्तामधे खिळे बुडवायचे. रक्तात बुडवलेल्या खिळ्यांची किंमत २०० – ५०० रु. असायची. त्यांचा असा समज होता की, कापणी केलेलं जे धान्य असतं, त्याच्यात जर ते खिळे ठेवले तर उत्पादन वाढतं. नरबळीच्या ह्या घटना घडायच्या दूरवर, पण एकदा असं झालं की आमच्या जवळच रायपूर नावाचं गाव होतं. तिथे आठव्या वर्गातला शिकणाऱ्या मुलाचा नरबळी देण्यात आला होता! तो कुणी दिला असेल, तर दोन मामा आणि सख्ख्या आजी-आजोबांनी! नरबळी देणारा माणूस प्रत्येक नरबळी देऊन झाल्यावर एक करदोडा बांधत असे. त्याचे शंभर करदोडे झाले होते. लोक त्याला इतके घाबरायचे! ती बातमी माझ्यापर्यंत आली. मग मी आणि सुनंदाचे पती तुषार, आम्ही दोघांनी तिथे जे मुख्य पुजारी असतात साठ-सत्तर खेड्यातले त्यांना पण सोबत घेतलं. आणि मग सारी तपासणी केली. जिचं मूल मेलं, ती बाई इतका आक्रोश करत होती आणि इतकी भीती की लोक काही बोलतच नव्हते आणि नंतर प्रकरण उघडकीला आलं. पोलिस केस झाली, त्या सर्वांना शिक्षा झाली आहे. मी पुढाकार घेतला आणि पोलीस कारवाई करवली, म्हणून आदिवासी नेते माझ्या विरोधात गेले आणि म्हणू लागले, "हा आमचा प्रश्न आहे! हा आमचा अंतर्गत मामला आहे. आमच्या धर्माचा भाग आहे. तुम्ही गैर आदिवासी आहात, तुम्ही बोलायचं नाही याच्यामध्ये." खूपच शिव्या दिल्या, मला मारण्याचं बाकी ठेवलं होतं. पण खंबीरपणे आम्ही त्याला तोंड दिलं. मग आम्ही म्हटलं, "ठीक आहे. आपण गावातल्या बायकांनाच विचारू की

त्यांना नरबळी हवा आहे का?" प्रत्येक गावांमध्ये जाऊन चौकशी केली आणि बाया म्हणाल्या - "अजिबात नको आम्हाला हा नरबळीचा प्रकार". त्याच्यानंतर लोकांनी त्यांची संसद भरवली आणि पूर्ण जिल्ह्यातल्या सर्व पुजाऱ्यांनी एकत्र येऊन मग ठरवलं की आता नरबळी बंद म्हणजे बंद! मला तर खूप त्रास झाला पण शेवट चांगला झाला की नरबळी प्रथा पूर्णतः बंद झाली.

आणखी एक गोष्ट मला सांगायची आहे की नक्षलवाद्यांनी आम्हाला कधीच त्रास दिला नाही. पण एकदा असं घडलं की नक्षलवाद्यांचा एक नेता मला सारखा निरोप पाठवायचा की मला एकटं जंगलात भेटायचंय. मी म्हणायची की मला नाही भेटायचं! मी कशाला भेटू तुला? मग त्याने धमकी द्यायला सुरुवात केली की, मी जर त्याला भेटले नाही तर आमच्या कार्यकर्त्याला ते मारून टाकतील आणि म्हणून मग शेवटी नाईलाजाने मी म्हटलं की, ठीक आहे मी भेटते. म्हणून त्यांनी जी वेळ सांगितली, अगदी दाट जंगलामध्ये जागा सांगितली होती, तिथे मी गेले. सुनील म्हणून त्यांचा जो प्रमुख कमांडर होता, असेल पंचवीस-सव्वीस वर्षाचा तरुण मुलगा, त्याने मला लाल सलाम वगैरे केला. मग तो म्हणे, "इथे नाही. मला अजून जंगलात जाऊन बोलायचं आहे. मी म्हटलं ठीक आहे. जिथं बोलायचं आहे तिथं बोल, पण कशासाठी बोलावले ते तर सांगशील!" तर त्यानी म्हटलं की "आम्हाला खंडणी पाहिजे. पैसे पाहिजेत आम्हाला." म्हटलं, "कशाचे पैसे? अजिबात पैसे देणार नाही! तुम्ही बेकायदेशीर काम करता मी कशाला पैसे देऊ तुम्हाला?" तर, "नाही आम्हाला इतका खर्च येतो तितका खर्च येतो". मी म्हटलं, "तो तुमचा प्रश्न आहे. जे करायचे ते करा, पण मी तुम्हाला एक पैसाही देणार नाही!" मग तो मला म्हणे की, "ठीक आहे, पैसे नका देऊ. मग तुम्ही आम्हाला औषधं द्या." मी म्हटलं, "अजिबात देणार नाही. माझ्याकडे औषध कंपनी नाही." मग तो म्हणे की, "मग तुम्ही आम्हाला जीप द्या, आम्हाला कधी इकडे तिकडे जायला लागली तर." मी निक्षून सांगितलं – "काहीही देणार नाही." मी त्याला चांगलीच रागवले. म्हटलं, "तुम्ही सारे बेकायदेशीर कृत्ये करता. मग आम्ही कशाला तुम्हाला पैसे देऊ? नाही म्हणजे नाही देणार. तुला जे करायचं आहे ते कर." त्याच्या हातात पिस्तूल होती आणि तो मला म्हणाला की, "तुम्हाला मृत्यूची भीती नाही वाटत का?" मी म्हणाले, "अजिबात नाही!" म्हणे, "का?" " कारण ज्या क्षणी मी जन्माला आले त्याच क्षणी ठरलं की मी मरणार आहे. त्यामुळे मला मृत्यूची भीती नाही." तर तो मला म्हणाला, "तुम्ही एकदम आमच्यासारख्या आहात. आम्हाला पण मरण्याची भीती नाही." मी म्हणाले, "तुझ्यात आणि माझ्यात फरक आहे. तुला हातामध्ये पिस्तूल घेऊन मरण्याची भीती नाही, पण माझ्याकडे गांधीजींचे अहिंसेचे शस्त्र आहे. मी तुझ्या हातातल्या शस्त्राला घाबरत नाही! जे करायचे ते कर. काय रे तुम्ही तरुण पोरं असे फालतू धंदे करता!" "नाही मॅडम, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. आणि मला तुमच्याबद्दल खूप आदर आहे. पण आता आम्हाला वरून आदेश येतात, ते पाळावे लागतात." मी म्हणाले, "हे अजिबात चालणार नाही. मी अजिबात पैसे देणार नाही." "मॅडम तुम्ही खूप चांगल्या आहात, माझी मुद्दाम नेमणूक केलेली आहे तुमच्याशी बोलण्यासाठी. मी तुमच्याविषयी काय काय ऐकलं आहे. मला खूप आदर आहे", आणि मग आमचा तो विषय तिथेच संपला.

त्याच्यानंतर तीन दिवसांनी मला एक सुंदर पत्र आलं. भारतीय नक्षलवाद्यांचा जो सर्वोच्च नेता आहे, त्याचं सुंदर अक्षरातलं आणि उत्कृष्ट हिंदीतलं पत्र होतं की, "मॅडम! हम बहुत शर्मिंदा है कि, हमने आपसे इस तरह से पैसे मांगे, बहुत बडी गलती कि हमने। हम आपके प्रति बहुत आदर जताते हैं। ऐसी गलती हम आइंदा कभी भी नही करेंगे। आप खुले दिलसे, निश्चिंत होकर काम कीजिए। .... लाल सलाम!" मला इतकं भरून आलं, शेवटी आपण जर आपल्या मार्गावरती नीट राहिलो आणि सत्याची कास जर सोडली नाही, घाबरलो नाही, तर आपण निश्चितच माणसाचं मन बदलू शकतो. आपण ज्यांना क्रूर म्हणतो, त्यांचंही. त्यानंतर त्यांनी खरोखरीच कधीही काही मागणी केली नाही, ती पहिली आणि शेवटची वेळ होती की त्यांनी आमच्याकडे काही मागणी केली. तर हे जे सर्व वेगवेगळे अनुभव येतात, इतक्या प्रकारचे अनुभव आहेत, मी किती सांगू आणि किती नाही! पण हे असे पाहिलं की माणसावरचा विश्वास वाढतो. चांगुलपणावरचा विश्वास वाढतो, की कुठेतरी चांगुलपणा आहे! आणि सत्याचा विजय होतो. तर शेवटी मी ईशावास्योपनिषदामधल्या काही ओळी म्हणेन -

"इह लोकी कर्मे करीत करीतच,
शंभर वर्षे जगण्याची इच्छा धरावी,
तुला देहवंताला हाच मार्ग आहे, ह्याहून वेगळा मार्ग नाही,
मनुष्याला कर्म चिकटत नाही, फलवासना चिकटते"

तर आपण आपल्या मार्गावरती ठाम राहायचं, सत्याच्या मार्गावर राहायचं, हीच शिकवणूक त्याच्यातून दिलेली आहे. नमस्कार!

*(४ नोव्हेंबर २०२२ रोजी मगन संग्रहालय, वर्धा येथील प्रांगणात दिलेल्या श्रीकांत कारंजेकर स्मृती 'अश्वत्थ विमर्श ' व्याख्यानाचा संपादित अंश)*

*(व्याख्यान लिखित रूपात उपलब्ध करून दिल्याबद्दल अमृत बंग व सहकाऱ्यांचे आभार!)*

***